मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/
# वृत्तमानस
मुंबई/ पालघर | मुंबई, गुरुवार, ३ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १०३ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये
Email : vrittamanas1@gmail. com




## प्रशांत किशोरांनी केली 'जनसूराज'ची अधिकृत घोषणा

**पाटणा :** प्रशांत किशोर यांनी आज आपल्या 'जनसूराज' पक्षाची अधिकृत घोषणा केली आहे. निवडणूक रणनीतीकार म्हणून नावारुपाला आलेल्या पीकेंनी आता बिहारमधून सक्रीय राजकारणात प्रवेश केला आहे. पाटण्यात आयोजित कार्यक्रमातून त्यांनी पक्ष स्थापनेची घोषणा केली. पीकेंनी मनोज भारती यांना पक्षाचे कार्यकारिणीचे अध्यक्ष केले आहे.माजी केंद्रीय मंत्री देवेंद्र प्रसाद यादव, प्रशासकीय सेवेतून राजकारणात आलेले पवन वर्मा, माजी खासदार मोनाजीर हसन यांच्यासह अनेकांच्या उपस्थितीत पाटण्यात जन सुराजचा शुभारंभ करण्यात आला. नुकतीच पोलिस सेवेतून निवृती घेतलेले आयपीएस अधिकारी शिवदिप लांडे किशोर यांच्या पक्षात सक्रिय होण्याची शक्यता आहे.

## रात्रीस खेळ चाले...
## आधी 'मातोश्री' मग 'वर्षा'
### मध्यरात्रीनंतर मुकेश अंबानी ठाकरे-शिंदेंच्या निवासस्थानी




**प्रतिनिधी**
**मुंबई**

प्रसिद्ध उद्योगपती मुकेश अंबानी यांनी मंगळवारी रात्री उशीरा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंची 'मातोश्री' निवासस्थानी जाऊन भेट घेतली. विशेष म्हणजे या भेटीनंतर लगेच त्यांनी 'वर्षा' निवासस्थानी जाऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचीही भेट घेतली. रात्री एक वाजता मुकेश अंबानी वर्षा निवासस्थानी पोहोचले होते. त्यामुळेच या मध्यरात्रीच्या भेटींमागील नेमकं कारण काय याबद्दल उलटसुलट चर्चांना उधाण आलं आहे.

**रात्री साडेदहाला अंबानी 'मातोश्री'वर**

मुकेश अंबानी मंगळवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास उद्धव ठाकरेंच्या 'मातोश्री' निवासस्थानी पोहोचले. त्यांनी उद्धव ठाकरेंबरोबर सुमारे दोन तास चर्चा केली. रात्री साडेदहा ते साडेबारा दरम्यान मुकेश अंबानी आणि त्यांचे पुत्र अनंत अंबानी 'मातोश्री' निवासस्थानावर होते. दोन तासांनंतर अंबानींचा ताफा 'मातोश्री' या निवासस्थानावरुन बाहेर पडला. या भेटीदरम्यान तेजस ठाकरेही उपस्थित असल्याचे समजते.

**'मातोश्री'वरुन 'वर्षा'वर**

'मातोश्री' भेटीनंतर अंबानींचा ताफा थेट 'वर्षा' निवासस्थानी मुख्यमंत्री शिंदेंची भेट घेण्यासाठी गेला. या दोघांच्या भेटीदरम्यान अंबानींनी नेमकी काय आणि कोणत्या विषयांवर चर्चा केली यासंदर्भातील माहिती गुलदस्त्यातच आहे. 'वर्षा' निवासस्थानीही अंबानी पिता-पुत्र बराच वेळ होते. त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंबरोबर महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केल्याचे समजते. अशा पद्धतीने एकमेकांचे कट्टर राजकिय विरोधक असणाऱ्या नेत्यांना सर्वात मोठ्या उद्योगपतीने एकाच रात्री भेटण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असल्याचे म्हटले जाते.

## पुण्यात हेलिकॉप्टर कोसळलं, तीन ठार

**पुणे ।** पुणे येथील बावधन परिसरात हेलिकॉप्टर कोसळल्याची घटना बुधवार, २ ऑक्टोबर रोजी घडली आहे. यात दोन पायलट आणि एका इंजिनियरचा मृत्यू झाल्याची माहिती पुढे आली आहे. मुख्य म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुनिल तटकरे याच हेलिकॉप्टरमधून प्रवास करणार असल्याची माहिती पुढे आली आहे. पुण्यातील बावधनहून मुंबईच्या दिशेने हे हेलिकॉप्टर निघाले होते. परंतू, अचानक जंगली भागात हे हेलिकॉप्टर कोसळले आणि यात तिघांचा मृत्यू झाला आहे. धुक्यामुळे हे हेलिकॉप्टर कोसळले असल्याची प्राथमिक आहे.




## ठाकरे सेना लढवणार 100-105 जागा
### मॅरेथॉन बैठकीत एकमत

**मुंबई ।** विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता आता कोणत्याही क्षणी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता सर्वच राजकीय पक्षाकडून वेगाने तयारी केली जात आहे. महाविकास आघाडी व महायुतीच्या जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात आली आहे.

मविआचे जागावाटप गेल्या तीन दिवसांपासून सुरु आहे. त्यामध्ये महाविकास आघाडीचा फॉर्म्युला ठरला आहे. महाविकास आघाडीमध्ये उद्धव ठाकरे सेना 100 ते 105 जागा लढवणार असल्याचे समजते. ठाकरे सेनेच्या विधानसभानिहाय आढावा बैठका नुकत्याच पार पडल्या. त्यामध्ये गेल्या 10 दिवसांत मातोश्रीवर पार पडलेल्या बैठकीत राज्यातील मतदारसंघनिहाय बैठका घेण्यात आल्या. एकीकडे महाविकास आघाडीच्या बैठका पार पडत असताना दुसरीकडे स्थानिक पदाधिकाऱ्यांसमवेत उद्धव ठाकरे यांनी स्वतः उपस्थित राहून आढावा घेतला.









## पेल्हारमध्ये एटीएम फसवणुकीची टोळी गजाआड

**वसई :** पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत एटीएम बदलून फसवणूक करणाऱ्या दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. या आरोपींनी हातचलाखीने एटीएम कार्ड बदलून अनेकांची फसवणूक केली होती. अटक आरोपींची नावे महेश धनगर आणि रामपाल जाटव अशी आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, हे आरोपी एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी येणाऱ्या लोकांना मदतीच्या बहाण्याने फसवून त्यांचे एटीएम कार्ड बदलत असत आणि त्यानंतर त्यांच्या खात्यातील रक्कम काढून घेत असत. या प्रकरणात पेल्हार पोलिसांनी तातडीने तपास करून दोघांना गजाआड केले आहे. पेल्हारसह अन्य ठिकाणीही या टोळीने अनेक फसवणुकी केल्या असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी या प्रकरणी सखोल तपास सुरू ठेवला असून आरोपींविरोधात इतर जिल्ह्यांमध्येही गुन्हे नोंद असल्याची शक्यता आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# नालासोपारा, बोईसर मतदारसंघासाठी भाजपची फिल्डींग?

## राजकीय घडामोडींना वेग

प्रतिनिधी
■ वसई

येत्या नवरात्रीत महाराष्ट्र राज्य विधानसभेची घोषणा होऊन आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. तसेच विधानसभेच्या धामधुमीला सुरुवात होणार आहे. त्याच धर्तीवर भाजपने राजकीय हालचालींना वेग दिला आहे. दरम्यान, सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील बदललेल्या समिकरणांमुळे व मतदारांच्या विचारसरणीमुळे नालासोपारा



व बोईसर मतदारसंघात बहुजन विकास आघाडीला शह देण्यासाठी भाजप शिंदे गटाला ओव्हरटेक करून रणांगणात उतरेल असा राजकीय जाणकारांचा व्होरा आहे.

नालासोपारा व बोईसर बविआचे मजबूत बालेकिल्ले आहेत. याठिकाणी शिंदे गट व भाजप दोन्ही पक्ष निवडणूक लढवण्यास सज्ज झाले आहेत. नालासोपाऱ्यात भाजप जोर बैठका, संवाद दौरे करत असल्याने दोन्ही मतदारसंघ भाजप जवळपास काबीज करण्याच्या तयारीत आहे. तसेच नालासोपारा व बोईसर मध्ये शिंदे गट देखील भाजपला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांत उमेदवारांची रांग मोठी आहे. अद्याप निवडणुकीची अधिकृत घोषणा झालेली नसली तरी इच्छुकांची भाऊगर्दी मात्र वाढली आहे.

वसईसह नालासोपारा व बोईसर हे तिन्ही मतदारसंघ बहुजन विकास आघाडी जिंकणार असा विश्वास आमदार हितेंद्र ठाकूर यांनी व्यक्त केला आहे. तसेच जिल्ह्यातील इतर जागाही बहुजन विकास आघाडीच जिंकणार असा दावा बविआ कडून करण्यात येत आहे. स्वतः आमदार हितेंद्र ठाकूर यांनी राजकीय संन्यास घेतला असला तरी सध्याचे विरोधकांचे पारडे जड पाहता आमदार हितेंद्र ठाकूर यांनीच पुन्हा मैदानात उतरावे असा आग्रह बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते करत आहेत.

# वसई भूमी अभिलेख कार्यालयातील भ्रष्टाचाराचा पर्दाफाश होणार

## पालघर जिल्हा अधीक्षक शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आज वसईत येणार



प्रतिनिधी
■ वसई

वसईतील भूमी अभिलेख कार्यालय भ्रष्ट व्यवहारांचे केंद्र बनल्याचे आरोप सध्या समोर येत आहेत. शेतकऱ्यांचे हक्क बाजूला सारून विकासकांच्या फायद्यासाठी निर्णय घेतले जात असल्याच्या अनेक तक्रारींची नोंद झाली आहे. जमीन मोजणी प्रक्रियेतून होणारी दिशाभूल, शेतकऱ्यांना योग्य माहिती न देणे, तसेच आवश्यक कागदपत्रांमध्ये विलंब किंवा टाळाटाळ केल्याने शेतकऱ्यांचा संताप उफाळून आला आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेना (ठाकरे गट) यांनी पालघर जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयाकडे तक्रार केली आहे.

आज, ३ ऑक्टोबर रोजी, पालघर जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षक स्वतः वसईत येऊन शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून घेणार आहेत. शिवसेना (ठाकरे गट) चे जिल्हा सचिव, मिलिंद खानोलकर यांच्या पुढाकाराने ही बैठक आयोजित करण्यात आली असून, यामध्ये शेतकऱ्यांचे प्रश्न सखोलपणे मांडले जाणार आहेत. खानोलकर यांनी शेतकऱ्यांना दुपारी १ वाजता आपल्या संबंधित कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

भूमी अभिलेख कार्यालयाच्या विविध व्यवहारांबाबत अनेक तक्रारी समोर आल्या आहेत. विशेषतः आर्थिक देवाणघेवाण न करता शेतकऱ्यांचे कामे पुढे सरकत नाहीत, नकाशे अंतिम करण्याच्या प्रक्रियेत हेतुपुरस्सर अडचणी आणल्या जातात, आणि मोजणीच्या नावाखाली खोटी माहिती देऊन शेतकऱ्यांची फसवणूक केली जात आहे. या सर्व प्रकारांमुळे भूमी अभिलेख कार्यालयाचा कारभार आज चर्चेत येणार असून, या बैठकीत अनेक प्रकरणांचा उलगडा होण्याची शक्यता आहे.

# अवजड वाहतुकीचा मृत्यूचा सापळा

## नागरिकांच्या सुरक्षेसाठी कठोर उपाय आवश्यक

प्रतिनिधी
■ वसई

अंबाडी-शिरसाड मार्गावर अवजड वाहतुकीमुळे नागरिकांचे जीव धोक्यात येत आहेत. गेल्या महिन्यात या मार्गावर दोन निरपराध नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये चिंता आणि राग निर्माण झाला आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे हा मार्ग अजून किती निरपराधांचे बळी घेणार, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

मंगळवारी झालेल्या एका अपघातात, ट्रकने रिक्षाला जोरदार धडक दिल्याने रिक्षा चालक अमरजीत पांडे गंभीर जखमी झाले. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. रिक्षा चालक सीएनजी भरण्यासाठी जात असताना हा अपघात झाला.याशिवाय, मागील महिन्यात गणपतीसाठी खरेदी करून येत असलेल्या १२ वर्षीय मानसी पाटीलवर ट्रकने धडक दिल्याने तिचा जागीच मृत्यू झाला.



यासारखे अनेक छोटे-मोठे अपघात या मार्गावर रोज होत आहेत. अवजड वाहतुकीमुळे ट्रकांच्या क्षमतेपेक्षा जास्त माल वाहून नेल्यामुळे रस्त्यावर खडी, गिरीट पावडर आणि मोठे दगड पडत आहेत, ज्यामुळे दुचाकी चालकोंना अपघातांना सामोरे जावे लागते.

यामुळे हा मार्ग देखील दुरुस्तीच्या स्थितीत आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे, अन्यथा या मार्गावर मृत्यूचे सापळे सुरूच राहतील.

# मुख्यमंत्र्यांची लाडकी बहिण अजूनही रुसलेलीच

## सर्व कागदपत्रे पूर्तता, आधार कार्ड लिंक करूनही पैसे जमा नाहीत

प्रतिनिधी
■ वसई

महिलांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच त्यांच्या सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासनाने लाडकी बहीण योजना आणली आहे. या योजनेअंतर्गत काही महिलांना दोन महिन्यांचे हप्ते जमा झाले आहेत. मात्र सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनही, तसेच आधार कार्ड बँक खात्याला लिंक करूनही बहुतांश महिलांना अद्याप या योजनेचे पैसे बँक खात्यावर जमा न झाल्याने या बहिणी रुसलेल्या आहेत.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना महाराष्ट्र शासनाने राबवून महिलांना आर्थिक सहकार्य करण्याचे धोरण आत्मसात केले आहे. जुलै महिन्यात ही योजना अमलात आणून जुलै व ऑगस्ट अशा दोन महिन्यांचे दोन हप्ते अशी एकूण प्रत्येकी ३ हजारांची रक्कम शासनाने महिलांच्या खात्यावर जमा केली आहे. मात्र ज्या महिलांचे आधार कार्ड बँक खात्याला सीडेड आहे अशा महिलांनाच या योजनेचा लाभ मिळाला. आधार कार्ड बँक खात्याला सीडेड नसल्याने ज्या महिलांना बँक खात्यावर पैसे जमा झाले नाहीत, अशा महिलांनी त्यानंतर बँकेत धाव घेऊन आधार कार्ड सिडिंग करून घेतले.

मात्र सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनही तसेच आधार कार्ड सीडेड करूनही महिलांना बँक खात्यावर अद्याप पैसे जमा न झाल्याने या मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणी रुसलेल्या आहेत.



*मुंबई : बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या "उपायुक्त"(सामान्य प्रशासन) या महत्वाच्या पदावर नियुक्ती झालेल्या किशोर गांधी यांचे 'म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेने'च्या वतीने स्वागत करताना, उपाध्यक्ष डॉ.संजय कांबळे-बापेरकर,चिटणीस संजय वाघ, सल्लागार हरिष जामठे.*

# गोरेगावातील 'त्रिपुरा सुंदरी' शारदीय नवरात्रौत्सव जल्लोषात होणार साजरा

प्रतिनिधी
■ मुंबई

येत्या 3 ऑक्टोबरपासून देशभरात शारदीय नवरात्रौ उत्सवाला सुरुवात होत आहे. यंदाही दरवर्षीप्रमाणे गोरेगाव बेस्ट नगर येथील महात्रिपुरा सुंदरी मातेच्या मंदिरामध्ये नवरात्रोत्सव जल्लोषात साजरी होणार आहे. डॉ. स्वरुप प्रामाणिक आणि भाग्यश्री प्रामाणिक या दांम्पत्याने बेस्ट नगर येथील गजानन महाराज मंदिरात भव्य आणि आकर्षक अशा महात्रिपुरा सुंदरी मातेच्या मूर्तीची स्थापना केली आहे. महाराष्ट्रातील बहुदा महात्रिपुरा सुंदरीची ही एकमेव मूर्ती आहे. यंदाही 3 ऑक्टोबरपासून या मंदिरात मंदिर व्यवस्थापनाने भरगच्च अशा




कार्यक्रमाचे आयोजन केलं आहे.

यात अष्टमीला १०८ सुहासिनींचे पुजनाच विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यामुळे गोरेगावमधील भाविकांना या त्रिपुरासुंदरी मातेचं दर्शन घेता येणार आहे.

# बेस्टचे निवृत्त कामगार आंदोलनाच्या पवित्र्यात

प्रतिनिधी
■ मुंबई

ग्रॅच्युइटीचया थकीत रक्कमेवरील व्याज देण्याच्या मागणीसाठी बेस्ट उपक्रमातील निवृत्त कामगार बायका मुलांसह धरणे धरणार आहेत. आर्थिक स्थिती नीट नसल्याच्या कारणामुळे बेस्टचे व्यवस्थापन निवृत्त होणाऱ्या कामगारांना ग्रॅच्युइटी वेळेवर देण्याबाबत टाळाटाळ करीत आहे. न्यायालयाच्या दणक्यानंतर ग्रॅच्युइटी देण्यात आली असली तरी थकीत राहिलेल्या रकमेवरील व्याजाचा प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रॅच्युइटी थकीत राहिल्यास १० टक्के व्याज देण्याची कायद्यातच तरतूद आहे. त्यानुसार आपल्या थकीत रकमेवरील व्याज मिळावे, अशी निवृत्त कामगारांची मागणी आहे. अशी थकित रक्कम असलेल्या कामगारांची संख्या चार ते पाच हजारांच्या सुमारास आहे. व्याज देण्याबाबत कामगार व औद्योगिक न्यायालयानेही कामगारांच्या बाजूने निर्णय दिले आहेत. तरीही व्यवस्थापन त्यावर अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे बेस्ट जागृत कामगार संघटनेचे नेते सुहास नलावडे यांनी सांगितले.

एका बाजूला निधी नाही, म्हणून व्यवस्थान ग्रॅच्युइटी व त्यावरील व्याज देत नाही, दुसरीकडे कामगार व औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या निवाडयाच्या विरोधात उच्च न्यायालयात धाव घेऊन व्यवस्थापन वकिलांच्या फीवर करोडो रुपये उधळत आहे, असा आरोपही श्री. नलावडे यांनी याबाबत बोलताना केला. बेस्टच्या महाव्यवस्थापकांनी राज्य सरकारला पत्र लिहून थकित ग्रॅच्युइटीवरील व्याजाचा दर कमी करण्याबाबत लिहिले आहे. मात्र याबाबत राज्य सरकारकडून कोणतेही आदेश आलेले नाहीत. या पार्श्वभूमीवर बेस्ट व्यवस्थापनाने कामगारांची अंतिम देणी वेळीच देणे आवश्यक आहे. मात्र याबाबत टाळाटाळ होत असल्यामुळे निवृत्त कामगार पत्नी व मुलांसह धरणे धरणार असल्याचे श्री. नलावडे यांनी सांगितले.

# डहाणूत भाजप उमेदवारीसाठी सुरेश बंड्या शिंदा यांचे नाव चर्चेत

प्रतिनिधी
■ पालघर

डहाणू विधानसभा क्षेत्रासाठी भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारीसाठी उच्चविद्याविभूषित कार्यकर्ते आणि आदिवासी समाजाच्या हितासाठी झटणारे जेष्ठ कार्यकर्ते सुरेश बंड्या शिंदा यांच्या नावाची चर्चा जोरात आहे. तलासरी तालुक्यातील उधवा गावचे लोकप्रिय भाजपनेते म्हणून शिंद यांची ओळख आहे.

सहकार भारती तलासरी ,राज्य सदस्य: भारतीय जनता पार्टी आदिवासी आघाडीचे नेते ,गेले आठ वर्षापासून पक्षाचा पूर्ण वेळ कार्यकर्ता,माजी आमदार चिंतामण वनगा आणि विष्णू सावरा यांच्या नेतृत्वातील अनेक आंदोलनांत सक्रिय सहभाग घेणारे सुरेश शिंदा यांनी जेष्ठ नागरिक विधवा, महिला यांना सारकारी योजनांचा लाभ मिळवून दिला.

वकील- राहुल त्रिपाठी

**वसई येथील श्री. एम.ए.एम.जे. शेख सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर यांचे न्यायालयात**

**जाहीर नोटीस**

रे.मु.नं. : ५७६/२०२३
निशानी क. २८
पुढील तारीख : १९/११/२०२४

हेलन फरेरीया ....वादी

विरुद्ध

डेनिस घोन्सालविस व इतर ...प्रतिवादी

प्रति,
Def.No. 10 Name: Rex John Gonsalves
R/at. Gaiwadi, Holi
Taluka, Vasai Dist. Palghar
Def.No. 11 Name: Faloni John Gonsalves
R/at. Gaiwadi, Holi
Taluka, Vasai Dist. Palghar
Def.No. 12 Name: Sara John Gonsalves
R/at. Gaiwadi, Holi
Taluka, Vasai Dist. Palghar
Def.No. 13 Name: Ivona John Gonsalves
R/at. Gaiwadi, Holi
Taluka, Vasai Dist. Palghar
Def.No. 20 Name: Lorna Raju Gonsalves
R/at. Dolbhatwadi, Near Duppalwadi, Saloli,
Vasai West Taluka. Vasai Dist. Palghar
Def No. 21 Name: Arina Gabrial Gonsalves
R/at. Khopwadi, Near Shan.i Mandir, Vasai West
Taluka, Vasai Dist. Palghar
Def No. 24 Name: Vency Gabrial Gonsalves
R/at. Khopwadi, Near Shani Mandir, Vasai West
Taluka, Vasai Dist. Palghar
Def No. 30 Name: Jejvin Ignetious D'Silva
R/at.Bhatgharwadi, Holi, Vasai West
Taluka. Vasai Dist. Palghar

ज्या अर्थी सदरचे वादी यांनी मे. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर वसई यांच्या न्यायालयात सदरचा नियमित दिवाणी दावा क्र. ५७६/२०२३ दाखल केला आहे.

त्याअर्थी असे जाहिर करण्यात येते की, सदरहु नियमित दिवाणी दावा मध्ये, उपनिर्दिष्ट वरील प्रतिवादी यांच्यावर प्रत्यक्ष नोटीसची बजावणी झालेली नसल्यामुळे ही जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहेत. तरी सदर प्रतिवादी अगर त्यांचे प्रतिनिधींनी त्यांची बाजु मांडण्यासाठी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत किंवा दिनांक १९ माहे नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उपरनिर्दिष्ट प्रकरणी सामील होउन आपले लेखी म्हणणे नोंदवावे आणि तसेच या लेखावरून असे कळविण्यात येते की सदरहु मुदतीत आपले लेखी म्हणणे न आल्यास न्यायालय वादीचे म्हणणे ऐकून प्रस्तुतच्या अर्जात निकाल देण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ३० माहे सप्टेंबर २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

हुकुमावरून
सही/-
सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय, क स्तर, वसई

**PANVEL MUNICIPAL CORPORATION**

**SOLID WAST MANAGEMENT DEPARTMENT**

Office No :- 27458040/41/42 Fax No :- 022-27452233
E-Mail :- panvelcorporation@gmail.com

**Tender No.PMC/SWM/2524/SR.51/800/2024-25**

The Commissioner, Panvel Municipal Corporation invites online bids Appropriate from experience Contractors for the construction of work detailed in the table. The bidders may submit bids the following works.

| Sr. no. | Name of work | Approximate value | Bid security | Cost of tender doc | Period of completion |
|---|---|---|---|---|---|
| 1 | BEAUTIFICATION & UPGRADATION OF NALLA INPANVEL MUNICIPAL CORPORATION AREA | 23,57,05,891 | 11,78,600 | 3540/- (with GST) | 18 months (excluding mansoon) |

| | |
|---|---|
| 1 | Bid form, conditions of contract, specifications and contract drawings can be downloaded from the e- tendering portal of urban Development Department, Gov. of Maharashtra. http://mahatenders.gov.in Further information regarding the work can be obtained from the office of the undersigned. |
| 2 | The fees of bid document amounting Rs.3540/- As mentioned above shall be paid on line through payment gateway. The fees of tender document will be non-refundable. |
| 3 | The bids are to be submitted online only |
| 4 | Other details can be seen in the bidding documents |

| | | |
|---|---|---|
| Publish Date | : | 03/10/2024 AT 11:00 |
| Document Download Start Date | : | 03/10/2024 AT 11:00 |
| Document Download End Date | : | 10/10/2024 AT 11:00 |
| Date of Pre bid Meeting | : | 07/10/2024 AT 11:00 |
| Bid Submission Start Date | : | 03/10/2024 AT 11:00 |
| Bid Submission End Date | : | 10/10/2024 AT 11:00 |
| Bid Opening Date | : | 11/10/2024 AT 11:00 |
| Validity of Application | : | 120 DAYS |

SD/-
Additional Commissioners
Panvel Municipal corporation

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२४/प्र.क्र.५१७/५१९/२०२४

**05.10.2024 पासून प्रभावी सुधारित मुख्य मार्ग उपनगरीय वेळापत्रक**

**उपनगरीय वेळापत्रकात बदल**

दादर टर्मिनेटिंग/ओरिगिनेटिंग ट्रेन्सचा विस्तार परळ पर्यंत

| सध्याची वेळ (वाजता) | | | | | विस्तारीत (वाजता) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ट्रेन कोड | पासून | प्रस्थान | पर्यन्त | आगमन | ट्रेन कोड | पासून | प्रस्थान | पर्यन्त | आगमन |
| अप ट्रेन | | | | | | | | | |
| DT 2 | ठाणे | 07.28 | दादर | 08.07 | PK 4 | कल्याण | 06.54 | परळ | 08.10 |
| DTL 2 | टिटवाळा | 08.09 | दादर | 09.37 | PTL 2 | टिटवाळा | 08.09 | परळ | 09.40 |
| DK 10 | कल्याण | 11.42 | दादर | 12.55 | PK 16 | कल्याण | 11.42 | परळ | 12.58 |
| DT 4 | ठाणे | 17.14 | दादर | 17.51 | PT 6 | ठाणे | 17.10 | परळ | 17.50 |
| DT 6 | ठाणे | 17.31 | दादर | 18.10 | T 108 | ठाणे | 17.31 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 18.29 |
| DDL 2 | डोंबिवली | 17.32 | दादर | 18.35 | PDL 6 | डोंबिवली | 17.32 | परळ | 18.38 |
| DT 8 | ठाणे | 18.24 | दादर | 19.03 | PT 8 | ठाणे | 18.24 | परळ | 19.06 |
| DDL 4 | डोंबिवली | 18.37 | दादर | 19.39 | PDL 8 | डोंबिवली | 18.37 | परळ | 19.42 |
| DT 10 | ठाणे | 19.10 | दादर | 19.49 | PT 12 | ठाणे | 19.10 | परळ | 19.52 |
| DK 14 | कल्याण | 19.08 | दादर | 20.20 | PK 28 | कल्याण | 19.08 | परळ | 20.23 |
| DT 12 | ठाणे | 21.41 | दादर | 22.20 | PT 14 | ठाणे | 21.39 | परळ | 22.21 |
| डाऊन ट्रेन | | | | | | | | | |
| DK 1 | दादर | 08.22 | कल्याण | 09.34 | PK 7 | परळ | 08.17 | कल्याण | 09.34 |
| DK 3 | दादर | 09.44 | कल्याण | 10.53 | K 31 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 09.26 | कल्याण | 10.53 |
| DK 7 | दादर | 13.05 | कल्याण | 14.15 | PK 15 | परळ | 13.10 | कल्याण | 14.23 |
| DDL 1 | दादर | 17.58 | डोंबिवली | 18.58 | PDL 11 | परळ | 17.55 | डोंबिवली | 18.58 |
| DK 13 | दादर | 18.19 | कल्याण | 19.32 | PK 25 | परळ | 18.15 | कल्याण | 19.32 |
| DK 15 AC | दादर | 18.43 | कल्याण | 19.54 | PK 27 AC | परळ | 18.45 | कल्याण | 19.58 |
| DK 17 | दादर | 19.11 | कल्याण | 20.27 | PK 29 | परळ | 19.10 | कल्याण | 20.26 |
| DDL 3 | दादर | 19.43 | डोंबिवली | 20.45 | PDL 13 | परळ | 19.47 | डोंबिवली | 20.49 |
| DT 3 | दादर | 19.59 | ठाणे | 20.37 | PT 9 | परळ | 19.56 | ठाणे | 20.37 |
| DK 21 | दादर | 20.27 | कल्याण | 21.38 | PK 31 | परळ | 20.32 | कल्याण | 21.45 |

गाड्यांचा विस्तार

| विद्यमान वेळ ( वाजता ) | | | | | पर्यंत विस्तारित ( वाजता ) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ट्रेन कोड | पासून | प्रस्थान | पर्यन्त | आगमन | ट्रेन कोड | पासून | प्रस्थान | पर्यन्त | आगमन |
| A 67 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 23.51 | अंबरनाथ | 01:32 | BL 61 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 23.51 | बदलापूर | 01.39 |
| T 18 | ठाणे | 06.12 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 07.08 | K 4 | कल्याण | 05.39 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 07.08 |
| CTL 5 | विद्याविहार | 06.46 | टिटवाळा | 07.59 | TL 5 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 06.14 | टिटवाळा | 07.58 |
| T 28 | ठाणे | 07.55 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 08.53 | K 20 | कल्याण | 07.21 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 08.53 |
| TL 29 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 13.10 | टिटवाळा | 14.57 | N 19 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 13.10 | कसारा | 15.59 |
| T 79 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 14.20 | ठाणे | 15.15 | K 71 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 14.20 | कल्याण | 15.49 |
| T 100 | ठाणे | 16.35 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 17.32 | K 56 | कल्याण | 16.04 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 17.32 |
| A 29 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 13.50 | अंबरनाथ | 15.31 | BL 27 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 13.50 | बदलापूर | 15.39 |
| A 50 | अंबरनाथ | 15.50 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 17.09 | BL 40 | बदलापूर | 15.47 | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | 17.13 |

मुख्य मार्गासाठी नवीन उपनगरीय वेळापत्रक (सुधारित तपशिलांसह) दि. 04.10.2024 पासून http://www.cr.indianrailways.gov.in/ वर उपलब्ध असेल. वेळापत्रक/मुंबई उपनगर या लिंकचे अनुसरण करावे.

मध्य रेल्वे
www.cr.indianrailways.gov.in

Download UTS App for Tickets DE-451

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 103
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - १०३
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

# निलेश राणे शिंदे सेनेत प्रवेश करणार?

## मुख्यमंत्री भेटीनंतर चर्चांना उधाण

प्रतिनिधी
■ मुंबई



राज्याच्या राजकारणातून मोठी बातमी समोर आली आहे. भाजप खासदार नारायण राणे यांचं सुपुत्र माजी खासदार निलेश राणे हे लवकरच एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे. याच पार्श्वभूमीवर नारायण राणे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीनंतर या राजकीय चर्चांना उधाण आलं आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीमधील घटक पक्षांनी जोरदार सुरुवात केली आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खासदार नारायण राणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीत कुडाळ विधानसभा मतदारसंघावर राणे कुटुंबीयांनी दावा केला आहे. तर महायुतीतील जागावाटपात कुडाळ विधानसभा मतदारसंघ एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या वाट्याला जाण्याची शक्यता आहे.

त्यामुळे निलेश राणे हे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करून शिवसेनेकडून कुडाळ-मालवणचे उमेदवार असण्याची शक्यता आहे. आज नारायण राणे आणि मुख्यमंत्री यांच्यात झालेल्या बैठकीत निलेश राणेंच्या प्रवेशासंदर्भात चर्चा झाली. त्यावर पक्ष प्रवेशाचा हा तोडगा निघाल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली. निलेश राणे हे शिवसेनेत प्रवेश करणार असल्याच्या वृत्तानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

माजी खासदार निलेश राणे हे कुडाळ मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छुक आहे. यामुळे या मतदारसंघाबाबत नारायण राणेंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत चर्चा केल्याची माहिती मिळत आहे. राजकीय चर्चांनंतर आता निलेश राणे शिवसेनेत प्रवेश करणार का, याकडे सर्वांचं लक्ष लागलेलं आहे.

# गोळ्या रिव्हॉल्वरमध्ये का भरल्या? गोविंदाला उत्तरं देता येईनात

प्रतिनिधी
■ मुंबई



मुंबई पोलिसांनी अभिनेता गोविंदाचा जबाब नोंदवला आहे. मात्र पोलीस त्याच्या जबाबावर समाधानी नाहीत. गोविंदा काहीतरी लपवत असल्याचा पोलिसांना संशय आहे. गोविंदाला अनेक प्रश्नांची नीत उत्तरं देता येत नसल्याची सूत्रांची माहिती आहे. पोलीस या प्रकरणात सध्या तज्ज्ञांची मदत घेत आहेत. रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्यानंतर पोलीस पुन्हा एकदा गोविंदाचा जबाब नोंदवू शकतात.

खाली पडल्यानंतर रिव्हॉल्व्हरने ट्रिगर कसे केले हा मोठा प्रश्न आहे. खाली पडल्यावर रिव्हॉल्व्हरचा ट्रिगर दाबला गेल्याचा पोलिसांना संशय आहे. या प्रश्नावर गोविंदाच्या उत्तराने पोलिसांचे समाधान झालेले नाही. इतर अनेक प्रश्नांची उत्तरं पोलिसांना मिळत नाहीत. उदाहरणार्थ दुर्घटनेच्या वेळी गोविंदाच्या रिव्हॉल्व्हरमध्ये 6 गोळया होत्या, त्यापैकी एक गोळी सुटली. तो शस्त्र घरीच सोडून जाणार होता तर त्याने रिव्हॉल्वरमध्ये गोळया का भरल्या? त्याने रिव्हॉल्व्हरमधून गोळया का बाहेर ठेवल्या नाहीत?

गोविंदा दुर्घटनेशी संबंधित काही महत्त्वाची माहिती त्यांच्यापासून लपवत असल्याचा पोलिसांना संशय आहे. पंचनामाद्वारे सर्व काही उघड होऊ शकतं. घटनास्थळाच्या पंचनाम्यामध्ये यासंदर्भात काही महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता पोलिसांना आहे. मंगळवारी दुपारी 2 ते 4 वाजेपर्यंत पंचनामा झाला. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलीस तज्ज्ञांचीही मदत घेत आहेत. गोविंदाला रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्यानंतर या प्रश्नांबाबत पोलीस पुन्हा एकदा त्याचा जबाब नोंदवू शकतात.

गोविंदाचे मॅनेजर शशी सिन्हा यांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी 4.45 च्या सुमारास तो एका शोसाठी कोलकाता येथे 6 वाजताचे फ्लाइट पकडण्यासाठी घरातून निघणार होता. अभिनेता परवानाधारक रिव्हॉल्वर कपाटात ठेवत असताना ट्रिगर चुकून ढकलला गेला. त्यानंतर एक गोळी त्याच्या पायाला लागली.

# घाटकोपरच्या एन वॉर्डमध्ये राबविण्यात आले स्वच्छता अभियान

प्रतिनिधी
■ मुंबई



बृहन्मुंबई महानगरपालिका "एन" विभाग घाटकोपर पूर्व घनकचरा व्यवस्थापन विभाग यांच्यामार्फत १७ सप्टेंबर ते २,ऑक्टोबर या दरम्यान स्वच्छता अभियान राबविण्यात आले.


एन विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व चौक्या मधील सफाई कामगारांनी सफाई मोहीम राबवली काल २ ऑक्टोबर, महात्मा गांधी जयंती निमित्त विक्रोळी पार्क साईट येथील सफाई कामगारांना चौकीतील कनिष्ठ आवेक्षक यशवंत ठाकूर, यांनी स्वच्छते विषयी शपथ दिली. या वेळी चौकीतील मुकादम, मिलिंद जाधव, डॅनियल भांबळ, चंद्रकांत भिंगारदिवे,पोपट सातपुते, राजेश जाधव, प्रवीण भालेराव, निलेश पगारे, राजू शिंदे, अक्षय आडबल्ले, अशोक सरोदे, बाबु गायकवाड,संजय घोडेस्वार, व चौकीतील सर्वच कामगार आणि महिला कामगार उपस्थित होते.






















जो संयम बाळगू शकत नाही, तो कोणतेही युद्ध जिंकू शकत नाही!



- महात्मा गांधी



# स्वच्छतेच्या ठिकाणी लक्ष्मीचा वास

कचऱ्याचे विघटन ही तांत्रिक प्रक्रिया असली तरी ही प्रक्रिया सर्वदूर पोहोचलेली दिसत नाही. मोठ्या शहरांमध्ये बऱ्याच ठिकाणी कचऱ्याचे विघटन करणारी तांत्रिक प्रक्रिया उपलब्ध असते. मात्र गाव-खेड्यांत अशा सोयी-सुविधा अजूनही उपलब्ध होताना दिसत नाहीत. सध्याच्या काळात होणारा प्लॅस्टिकचा वापरदेखील वाढत्या कचऱ्याला कारणीभूत ठरतो. आपल्या प्रत्येक वापराच्या वस्तूंमध्ये प्लॅस्टिकचे आवरण असल्याकारणाने हे ढीग वाढत चालले आहेत. जगभरात प्लॅस्टिकचे दुष्परिणाम, त्याचे धोके वारंवार अधोरेखित केले जात आहेत. तरीही त्याचा वापर काही केल्या थांबत नाही. यावर पर्याय तितकेसे अजून उपलब्ध नाहीत. आणखी एक स्वच्छतेची समस्या असते ती म्हणजे ओला-सुका कचरा वेगळा करण्याची ! प्रशासनाने कितीही बजावून सांगितले तरीही लोकांना तशी सवय अजून लागत नाही. 'हागणदारीमुक्त गाव' अभियान सुरू करून प्रशासनाने अनेक गावे 'हागणदारीमुक्त' केली. त्यापैकी बरीच गावे फक्त कागदोपत्रीच 'हागणदारीमुक्त' झाली असल्याचे स्पष्ट होते. गेल्या पाच वर्षांत, केंद्र आणि राज्य सरकारांनी स्वच्छ भारतवर ८० हजार कोटी रूपयांपेक्षा अधिक रक्कम खर्च केली आहे. सरकारी अहवालात १० कोटी १६ लाख घरांमध्ये शौचालये बांधली असल्याचे म्हटले आहे. स्वच्छता ही अंगभूत व्हावी लागते. स्वच्छता ही सेवा स्वरूपात उपलब्ध नाही. ती जशी व्यक्तिगत सवय आहे तशी सार्वजनिक आहे. किंबहुना ती व्यक्तिगततेतून सार्वजनिक होत जाते. त्यामुळे स्वच्छतेबाबतचा विचार हे लोकांना आधुनिक बनवण्याचे उत्तम साधन ठरते. शौचालये बांधणी आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेची जाणीव निर्माण करणे या दोन गोष्टी भिन्न भिन्न आहेत. भारतीयांची मानसिकता केरकचरा उचलणे, घाण साफ करणे ही कामे विशिष्ट वर्गाची किंवा स्वच्छता कामगारांची आहेत; ती त्यांची नव्हे अशी आहे. त्या मानसिकतेत बदल होत नाही, तोपर्यंत 'स्वच्छ भारता'चे स्वप्न साकार होणे मुश्कील आहे. भारतीयांना मानवी विष्ठा, घाम आणि ने डोक्यावर कापलेले केस यांमुळे पर्यावरणावर परिणाम होऊन प्रदूषण वाढीला लागते असे वाटत नाही. घामेजले स्त्रीपुरुष हे तर त्यांच्या कष्टांचे वे गौरवचिन्ह ठरते. भारतीयांना त्यांनीच व त्यांनी निर्माण केलेली घाण साफ व करायची असते अशी सवय जोपर्यंत लागत नाही, तोपर्यंत 'स्वच्छ भारता'च्या दिशेने वाटचाल कशी होणार? स्वच्छता हा माणसांच्या व्यक्तिगत आचाराचा भाग झाला पाहिजे. पाश्चिमात्य जगात स्वच्छतेच्या मोहिमेला १८५० च्या सुमारास आरंभ. झाला, पण स्वच्छतेची कामे करण्यासाठी त्यांच्याकडे भारताप्रमाणे समाजातील विशिष्ट वर्ग नव्हता. त्यामुळे त्यांना मैला साफ करणे, घाण उचलणे इत्यादी कामे करण्यासाठी समाजातील विशिष्ट वर्गाची गरज हे भासली नाही. त्या व्यवस्था हळुहळू व्यावसायिक पातळीवर होत गेल्या. भारतात अस्वच्छ परिसर आणि व आजार यांचा संबंध घनिष्ट आहे ही धारणा जनमानसात बिंबलेली नाही. त्यामुळे लोक घाणीमुळे दुर्गंधी पसरली तर नाकाला रुमाल धरून गप्प बसतात, परंतु त्यांना त्या दुर्गंधीमुळे हे आजार होऊ शकतो अशी भीती नाही. जोपर्यंत ठिकठिकाणी कचऱ्याचे साचले आहेत, गायी त्यांचे पोट प्लास्टिकवर भरताहेत, गटारे तुंबलेली आहेत, नद्यांमध्ये कचरा साठलेला आहे आणि त्याच्या परिणामी, सर्वत्र दुर्गंधी पसरलेली आहे, तोपर्यंत स्वच्छ भारताचे स्वप्न साकार होणे दूरच; भारत त्याच्या जवळपास तरी गेला असे म्हणता येईल का? भारतीयांच्या चांगले आरोग्य आणि स्वच्छ पर्यावरण यांचा परस्परसंबंध सहजासहजी लक्षात येत नाही. शौचालये बांधण्याच्या व्यापक कार्यक्रमाबरोबर ठिकठिकाणी साचलेले कचऱ्याचे ढीग, तुंबलेली गटारे साफ होणे महत्त्वाचे आहे. भारतातील नद्यांमध्ये प्रचंड प्रमाणावर निर्माल्य, घाण पडलेली असते. जलाशयांमध्ये घाणीचे साम्राज्य असते, पाणी कमी दिसते. केंद्र शासनाने गंगानदी साफ करण्याचा मोठा प्रकल्प हाती घेतला आहे. त्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयानेच म्हटले आहे, की गंगा आगामी दोनशे वर्षांत तरी स्वच्छ होणार नाही! भारतातील सर्वच नद्यांमध्ये प्रचंड प्रमाणावर घाण पडलेली असून त्यामुळे पर्यावरण दूषित होते. नद्यांचे पाणी दूषित झाल्याने जलचरांचे जीवन संपुष्टात येते. अनेक आजार नद्यांचे पाणी मोठ्या प्रमाणावर दूषित झाल्याने व नद्यांमधील केरकचरा कुजल्याने नदीकाठावरील पर्यावरण दूषित होऊन उद्भवतात. केवळ मोठ्या प्रमाणावर शौचालये बांधून स्वच्छ भारताचे स्वप्न साकार होणार नाही. जी गावे स्वच्छता अभियानात पुरस्कार घेतात, ती धन्य होण्यात समाधान मानतात. एकीकडे गावोगाव फिरणाऱ्या भारतीय माणसांना स्वच्छ गावे कोठे दिसलेली नाहीत ही खरी वास्तवता आजही कायम आहे. जनतेला अस्वच्छ परिसर व आजार यांचा अन्योन्य संबंध पटवून देऊन प्रदूषण अस्वच्छ परिसरामुळे फार मोठ्या प्रमाणावर होऊन रोगराई सुद्धा पसरते. सार्वजनिक ठिकाणी कचरा व घाण न करण्याच्या जाणिवेचा अभाव यामुळे अनेकदा प्रशासनाने प्रामाणिकपणे काम करूनही त्यावर पाणी फेरले जाते. शौचालय बांधण्यात होणारा भ्रष्टाचार, उतरत नसल्याची सबब देत उघड्यावर शौचाला जाण्याची मानसिकता न बदलण्याचा कल, गरिबी आणि उत्पन्नाअभावी स्वच्छतेला आणि शौचालयांना नसलेले प्राधान्य, सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालये स्वच्छ राखण्यासाठी लागणाऱ्या पाण्याची टंचाई आणि स्वच्छतेचे लक्ष्य साध्य करण्यासाठी लागणाऱ्या निधीचा अभाव अशा विविध कारणांमुळे या मोहिमेला अनेकदा खीळ बसते. उघड्यावर शौच करणारा भारताचा साठ टक्के ग्रामीण भागही हागणदारीमुक्त होईल, अशी अपेक्षाही निर्माण झाली. पण मोदींनी स्वच्छ भारताचा नारा देऊनही स्वच्छतेविषयी ग्रामीण भारताच्या मानसिकतेवर चढलेला मागासलेपणाचा बुरसा दूर होणे तर दूरच, शहरी भारताचीही मानसिकता बदलली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. जगभर दोन गोलार्धांत उत्तर-उत्तर आणि दक्षिण-दक्षिण असा फरक होता. उत्तरेकडे श्रीमंती व सत्ता होती. दक्षिणेकडे गरिबी व वंचितता. त्याचे प्रमुख कारण लोकसंख्येची अनियंत्रित वाढ हे होते. त्या लोकसंख्येसाठी तेवढ्या मोठ्या सार्वजनिक व्यवस्था निर्माण करणे अवघड होते. असे ते एकात एक गुंतलेले अनेक संदर्भ आहेत. आधुनिक काळात व्यक्तिगत स्वच्छता टोकाला नेली जात आहे. तोच भर सार्वजनिक स्वच्छतेवर येण्यास हवा. स्वच्छता हा माणसाला सर्वांगांनी भिडणारा विषय आहे. याची जाणीव तरी स्वच्छतेचे पुरस्कार घेताना असायला व व्यक्त व्हायला हवी. जोपर्यंत लोकांच्या विचारांत बदल येत नाही तोपर्यंत स्वच्छतेसंबंधी अभियान वेगवेगळ्या पद्धतीने राबवावी लागतील. यातील दुसरा मुद्दा असाही असतो की, मैल्याचे विघटन किंवा प्रक्रिया करणाऱ्या प्रणाली वाढत्या लोकसंख्येला अपुऱ्या पडतात. त्या सगळ्या ठिकाणी उपलब्ध असतातच असेही नाही. ज्या शहरांत त्या उपलब्ध असतील तिथे वाढत्या लोकसंख्येसाठी या प्रणाली अपुऱ्या ठरतात. त्यामुळे मैला नदीत सोडणे, नद्या प्रदूषित होणे, जलस्रोत प्रदूषित होणे असे चित्र सर्रास सगळीकडेच दिसते. रोजच स्वच्छतेचे भान राखावे लागेल. त्यासाठी सक्षम प्रणाली देखील उभी करावी लागेल. मुळातच विचार स्वच्छ तर गावे, शहरे स्वच्छ आणि देश स्वच्छ हे अनेक अर्थाने होऊ शकेल. त्याबाबत प्रत्येकाने सजग राहणे आणि तशी पावले उचलणे आवश्यक आहे. अन्यथा स्वच्छ भारताचे स्वप्न राहण्याची शक्यता आहे.

# कुशल व रोजगारक्षम महाराष्ट्र

कुशल मनुष्यबळ हे देशाच्या विकासात मोठे योगदान देत असते.सर्वांना व्यावहारिक आणि दर्जेदार शिक्षण देणे,देशातील उद्योग तसेच आवश्यक त्या क्षेत्राला अनुसरून गरजेनुसार तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण प्रणाली विकसित करणे, युवक-युवतींना विकसित माहिती तंत्रज्ञानासह ज्ञान अद्ययावत करणे,काळाच्या मागणीनुसार शिक्षण धोरण तयार करणे, केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या कौशल्य विकास विभागातंर्गत येणा-या सर्व योजना तसेच शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणा-या कौशल्य विकासाच्या योजना शासन प्रभावीपणे राबवत आहे.

**अधिकाधिक रोजगार निर्माण करणार:- मंगल प्रभात लोढा, मंत्री कौशल्य विकास, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील युवा पिढीला कौशल्ययुक्त बनविण्यासाठी मागील दहा वर्षात विविध नाविन्यपूर्ण योजना राबविल्या आहेत त्याच धर्तीवर राज्यात गेल्या सव्वा दोन वर्षात कौशल्य विकासाच्या योजना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविल्या जात असून राज्यातील युवक व युवतींना अधिकाधिक चांगले प्रशिक्षण घेतल्यानंतर रोजगार प्राप्त व्हावा यासाठी कौशल्य विकास विभागाचा पदभार घेतल्यापासून गेल्या सव्वा दोन वर्षात विविध निर्णय व योजना राज्यात सुरू करण्यात आल्या आहेत त्याची प्रभावी अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे.

**मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून कौशल्य विकास विभाग आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' राबवली जाणार आहे. योजने करीता ५ हजार ५०० कोटींची तरतूद करण्यात आली असून योजनेसाठी उमेदवाराचे वय १८ ते ३५ वर्ष असणे आवश्यक आहे. उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीत १२ वी उत्तीर्ण- रु.६ हजार, आय.टी.आय व पदविका उत्तीर्ण- रु.८ हजार, पदवीधर आणि पदव्युत्तर उत्तीर्ण - रु.१० हजार दरमहा विद्यावेतन मिळणार आहे. प्रत्येक आर्थिक वर्षात १० लाख कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) च्या संधी उपलब्ध होणार असून या योजनेत प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी १ व शहरी भागात पाच हजार लोकसंख्येसाठी १ असे एकूण ५० हजार योजनादूत नेमणार आहे.ही योजना राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी महत्वाची भूमिका बजावेल.

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना**

महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिला स्टार्टअप्सना निधी तसेच आर्थिक पाठबळ देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेत देशातील सर्वाधिक महिला स्टार्टअप्स असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख निर्माण करणे हा योजनेचा उद्देश आहे.या योजनेसाठी १०० कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून, सुमारे ५०० स्टार्टअप्सना २५ लाखांपर्यंत आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

**प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना**

पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या कारागिरांची व्यवसाय वृद्धी व्हावी यासाठी १८ प्रकारचे पारंपारिक व्यवसायां करणा-या विश्वकर्मांना ५ दिवसांचे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येते. लाभार्थ्यांना संबंधित व्यवसायाच्या टूलकिटसाठी रु.१५ हजार रकमेचे ई-व्हाऊचर दिले जाते.प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्याला प्रती दिवस ५०० रूपये प्रमाणे असे एकूण ३००० रुपये विद्यावेतन दिले जाते.प्रशिक्षणानंतर पात्र लाभार्थ्यांना व्यवसायवृद्धीसाठी विनातारण रुपये एक लाख रकमेचे ५ टक्के व्याजदराने कर्ज मिळेल. पहिल्या हप्त्याच्या कर्जाची नियमित परतफेड केल्यास,लाभार्थ्यांना पुढील रू. २ लाख रकमेचे ५ टक्के व्याजदराने विनातारण कर्ज मिळेल.जून, २०२४ पर्यंत राज्यामध्ये एकूण ३६,०४३ विश्वकर्मांनी यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केले आहे.

**आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजना**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्व देण्यात आलेले आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीतंर्गत "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र" ही नाविन्यपूर्ण योजना सुरु केली आहे.1000 नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येणार आहेत. प्रत्येक कौशल्य विकास केंद्रात प्रतिवर्षी साधारण १५० युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामुळे संपूर्ण राज्यात १५ ते ४५ वयोगटातील दरवर्षी साधारण १ लाख ५० हजार युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण मिळणार आहे.

**अप्रेंटिस योजना**

महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या 75 टक्के किंवा जास्तीत जास्त 5,000 रूपये यापैकी कमी असलेले विद्यावेतन शिकाऊ उमेदवारांना शासनातर्फे देण्यात येतात. महाराष्ट्र राज्यात एकूण 47 हजार 614 उद्योग व इतर आस्थापना शिकाऊ उमेदवारीसाठी नोंदणीकृत असून सद्यस्थितीत एकूण 8 हजार 536 उद्योग व इतर आस्थापना शिकाऊ उमेदवारी योजेनेची अंमलबजावणी करीत असून सद्यस्थितीत एकूण 2 लाख 54 हजार 839 शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण घेत आहेत.

**महाराष्ट्र इंटरनॅशनल**

आंतरराष्ट्रीय स्तरावर युवकांना रोजगार मिळण्यासाठी महाराष्ट्र शासन व आपल्या विभागामार्फत युवकांसाठी राज्यामध्ये महाराष्ट्र इंटरनॅशनल (Maharashtra International) हा स्वतंत्र कक्ष महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी अंतर्गत स्थापन करण्यात आला आहे. महाराष्ट्र इंटरनॅशनलव्दारे द्वारे परदेशात नोकरीसाठी जाऊ इच्छिणाऱ्या उमेदवार समुपदेशन आणि मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करणे. वाढीव कौशल्य प्रशिक्षण (incremental skill training) आणि निर्गमन पूर्व अभिमुखता (pre departure orientation) देण्यात येणार आहे.आंतरराष्ट्रीय भाषा प्रशिक्षण देखील देण्यात येणार आहे

**'महापुरुषांचे कौशल्य विचार' पुस्तका चा आयटीआयच्या अभ्यासक्रमात समावेश**

महापुरुषांच्या कौशल्य विषयक कार्याचा, धोरणाचा व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमांमध्ये समावेश केल्यामुळे व्यवसाय शिक्षण अधिक समृद्ध होऊन विद्यार्थ्यांचे कौशल्य वाढण्यासही मदत होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा जोतीराव फुले, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक,स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर या महापुरुषांच्या कौशल्य विषयक विचार ."महापुरुषांचे कौशल्य विचार" या पुस्तकात समावेश आहे. आयटीआयच्या सद्यस्थितीतील अभ्यासक्रमाव्यतिरिक्त हा विषय विद्यार्थ्यांना शिकविला जाणार आहे.

**आयटीआयमध्ये ७५ व्हर्चुअल क्लासरुम**

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यात ७५ व्हर्चुअल क्लासरूम सुरू करण्यात आल्या आहेत. व्हर्चुअल क्लासरूममध्ये इंटरॲक्टीव्ह पॅनल,संगणक सेवा, उत्तम बैठक व्यवस्था असणार आहे.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील 'स्कील इंडिया' व 'डिजिटल इंडिया' या उपक्रमातंर्गत राज्यातील ४१९ या सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) मध्ये व व ५४७ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना सहकार्य करून हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.

**लाईट हाऊस प्रकल्प**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग (SEEID), व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय (DVET) आणि लाइटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशन यांच्या मार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड येथे मुंबईतील पहिल्या लाइटहाऊस सुरू करण्यात आला आहे. या प्रकल्पामार्फत युवकांना विविध कौशल्य आणि व्यक्तिमत्व विकास विकासावर भर देण्यात येतो. कमी उत्पन्न गटातील१८ ते ३५ वर्षे वयोगटातील युवक आणि युवतींना माहिती, करिअर समुपदेशन, व्यावसायिक कौशल्ये देण्यात येत असून, नोकरी मिळवण्यासाठी आणि नंतरचेही सहकार्य करण्यात येत आहे.

**रोजगार मेळावे**

कौशल्य विकास विभागामार्फत उद्योजक आणि रोजगार इच्छुक उमेदवारामध्ये दुवा साधून रोजगार मेळावे आयोजित केले जातात. सन 2023-24 मध्ये माहे मार्च 2024 अखेर पर्यंत एकूण 581 रोजगार मेळावे पार पडले यामध्ये 95 हजार 478 उमेदवारांची नोकरीसाठी निवड झाली आहे. तर ५८१ रोजगार मेळाव्यामध्ये ५ नमो महारोजगार मेळावे व ३४ महिला रोजगार मेळावे यांचा समावेश आहे.

**नमो महारोजगार मेळावे**

नागपूर, लातूर, अहमदनगर, बारामती-पुणे, ठाणे येथे 5 नमो महारोजगार मेळावे पार पडले आहेत. या मेळाव्यामध्ये 1495 उद्योजकांनी सहभाग नोंदविला तर 1 लाख 57 हजार 139 उमेदवार या मेळाव्यासाठी उपस्थित होते.यामध्ये 60 हजार 691 उमेदवारांची नोकरीकरिता निवड करण्यात आलेली आहे.

**छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबीर**

राज्यातील विद्यार्थ्यांना युवक-युवतींना कौशल्य शिक्षणाचे व रोजगाराचे मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हास्तरावर ६ मे ते ६ जून २०२३ या कालावधीत करिअर मार्गदर्शन शिबीरांचे आयोजन करण्यात आले यामध्ये १ लाख ७४ हजार ६३८ युवक-युवतींनी सहभाग घेतला तर १५ हजार ४१३ पालकांनी सहभाग घेतला.

**"महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण २०१८"**

औद्योगीकतेला नाविन्यतेची सांगड घालून, महाराष्ट्रातील स्टार्टअप परिसंस्थेच्या विकास व नाविन्यपूर्ण संकल्पनांना, उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण २०१८" जाहीर केले. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील नाविन्यपूर्ण परिसंस्थेच्या विकासासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी काम करत आहे.

**स्टार्टअप वीक**

स्टार्टअप्सना शासनासोबत काम करण्याची संधी देण्यासाठी व प्रशासनात नाविन्यता आणण्यासाठी नावीन्यता सोसायटीतर्फे दरवर्षी "महाराष्ट्र स्टार्टअप वीक" हा उपक्रम राबावला जातो. या अंतर्गत विजेत्या स्टार्टअप्सना १५ लाखांचे कार्यालयीन आदेश देण्यात येतात.आतापर्यंत झालेल्या 5 आवृत्त्यांच्या १२० विजेत्या स्टार्टअप्सचे काम विविध विभागांसोबत चालू आहे.दरवर्षी,ग्रँड फिनाले दरम्यान, अव्वल १०० स्टार्टअप्सना स्टार्टअप एक्स्पो - व्हीसी मिक्सर, स्टॉल स्पेस उपलब्ध करून दिले जाते. महाराष्ट्र स्टार्टअप वीक ग्रँड फिनालेचा एक भाग म्हणून अखिल भारतीय स्तरावरील स्टार्टअप महासंमेलन आयोजित करण्यात येणार आहे.

**आयटीआय मध्ये 'रात्र अभ्यासिका'**

राज्यातील ४१९ आयटीआय मध्ये रात्र अभ्यासिका सुरू करण्यात आल्या आहेत.सामाजिक आणि आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पूरक वातावरण निर्माण करून आयटीआय बरोबर इतर संस्थामधील विद्यार्थ्यांनाही याचा लाभ घेता येणार आहे.

**सामंजस्य करार (MOU)**

कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून विभागामार्फत एक वर्षाकरीता असे एकूण 1,175 सामंजस्य करारनामे (MOU) करण्यात आलेले आहे. या सामंजस्य करारनाम्याद्वारे सुमारे 6.86 लाख रोजगार उपलब्ध होणार आहेत.

**महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ**

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात १८ अभ्यासक्रम शिकवले जातात. विद्यापीठ विविध उद्योगसमूहां बरोबर ५५ करार केले असून सगळ्या अभ्यासक्रमात उद्योग समूह विद्यार्थ्यांना ऑन द जॉब ट्रैनिंग देणार आहे. विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय प्लेसमेंट्स साठी एनएसडीसी इंटरनॅशनल बरोबर करार केला असून जपानी,जर्मन या भाषेचे कौशल्य प्रशिक्षण येथे देण्यात येत आहे. बिग डेटा,आर्टीफिसिअल इंटेलेन्स,सायबर सिक्युरिटीवर वर आधारित एमटेक या विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. विद्यापीठांने यावर्षी युरोपच्या नामवंत डिझाइन संस्था रुबिक बरोबर करार करून जागतिक दर्जाचा बीडीईएस इंडस्ट्रियल डिझाईन,इनटरॅक्शन डिझाईन अशा कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमांची निर्मिती केली आहे. विद्यापीठांनी I-स्पार्क फौंडेशनची विद्याविहार येथे स्थापना केली असून यामध्ये नवोपक्रमांना प्रोत्साहन देणे,मेन्टॉरिंग करणे,सीड फंड देणे देण्यात येतात. येथे नवसंशोधक कार्यरत आहेत.विद्यापीठांनी २० महाविद्यालयात प्रि इनक्यूबेशन केंद्रांची स्थापना केली असून १०० नवसंशोधकांनी आपले प्रस्ताव विद्यापीठात सादर केले आहे.

**संत गाडगेबाबा स्वच्छता अकादमीची स्थापना**

स्वच्छ भारत अभियानात कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी ठाण्यात संत गाडगेबाबा स्वछता अकादमी ची निर्मिती केली आहे. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठांनी केली असून बीबीए फॅसिलिटी मॅनेंजमेण्ट व इतर सर्टिफिकेट कोर्सेस भारत विकास ग्रुप या कंपनी बरोबर करार करून देण्यात येत आहेत. ३ महिन्यात ३०० लाभार्थीनी याचा उपयोग केला असून त्यांना रोजगार प्राप्त झाला आहे.

**स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास प्रबोधिनीची स्थापना**

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठातंर्गत स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास प्रबोधिनीची गोंवडी विद्याविहार येथे स्थापना करण्यात येणार आहे या प्रबोधिनीतून राज्यातील विद्यार्थ्यांना जर्मन,हिब्रू,जापानीज व फ्रेंच या चार परदेशी भाषांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.महाराष्ट्र इंटरनॅशनलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी व्हिसा सहाय्यता केंद्र देखील सुरू करण्यात येणार आहे. तसेच राज्यात पुणे,नाशिक,छत्रपती संभाजीनगर,अमरावती,नागपूर या सहा ठिकाणी ही प्रबोधिनी स्थापन करण्यात येणार आहे.

- संध्या गरवारे,
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

## पत्र मानस

### भाजपला शिंग फुटले!

२०२४ मध्ये महायुतीचं आणि २०२९ मध्ये केवळ भाजपच्याच बळावर महाराष्ट्रात सरकार आणू. त्यावेळी एकट्या कमळाचं सरकार असेल, असं विधान भाजपचे केंद्रातील वरिष्ठ नेते अमित शाह यांनी केलं आहे. अमित शाह यांनी केलेले स्वबळाचे विधान म्हणजे भाजपच्या मित्रपक्षांसाठी धोक्याची घंटा वाजली आहे. आर्थिक घोटाळ्यांच्या फाईली पुन्हा उघडल्या जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील भाजपच्या दोन्ही मित्रपक्षांच्या पायाखालची जमीन सरकली असावी, असे म्हटल्यास वावगे ठरु नये.. स्वत:ची राजकीय अवस्था लंगडी होती तोपर्यंत भाजपने इतर पक्षांच्या कुबड्या वापरल्या. त्यासाठी घराणेशाहीचे व आर्थिक घोटाळ्यांचे आरोप करुन विरोधी पक्ष फोडले. आता स्वबळाची भाषा केली जात आहे. कारण, भाजपला आता 'शिंग फुटले' आहेत.

**- सुधीर कनगुटकर, वांगणी**

### देशात उदंड झाल्या मोटारी व बाईक्स... नजीकच्या काळात परिस्थिती चिंताजनक

एका आकडेवारीनुसार देशात सुमारे ७ कोटी मोटारी व २१ कोटी दुचाकी आहेत . एकूण गाड्यामध्य साडे पाच लाख इलेक्ट्रिक बाईक्स आहेत . अर्थात ही लोकसभेत दिलेली माहिती आहे व ही आकडेवारी २०२० पर्यत ची आहे .ही माहिती नुकतीच वाचली गेल्या चार वर्षात यात आणखी मोठी वाढ अपेक्षित आहे . देशातील सर्वच रस्त्यावर वाहनांची प्रचंड गर्दी दिसून येते .अनेक प्रकारच्या गाड्या रस्त्यावर धावताना दिसून येतात . याचा मोठा परिणाम प्रदूषणावर झाला आहे . तसेच अनेक लहान मोठे अपघात होत आहेत गाड्या ठेवण्याचा सुद्धा मोठा प्रश्न निर्माण .झाला आहे . आज पुण्यासारख्या शहरात गाडी कोठे लावायची हा मोठा प्रश्न आहे आज अनेकांच्या घरात दोन तीन कार व दोन तीन बाईक्स सहज असतात . यामुळे देशाचा इंधनाचा खर्च प्रचंड प्रमाणात होत आहे . इंधन हे बाहेरून मागवावे लागत असल्याने त्यास मोठ्या प्रमाणात विदेशी चलन मोजावे लागते . साहजिकच राष्टाचे परकीय चलन मोठ्या प्रमाणात इंधनावर खर्च होत आहे . मोठ्या प्रमाणात कारच्या गर्दीमुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे . यामुळे दमा , श्वसनाचे विकार, नेत्रविकार दमा अशा प्रकारच्या व्याधी वाढत आहेत . दिल्ली सारख्या शहरात तर विध्यार्थांना श्वासांचे विकार जडले आहेत . व वाहनासाठी सम व विषम तारीख अशी व्यवस्था ठरविण्याची वेळ आली आहे . आपणाकडे एखादी कार असावी a प्रत्येकाला वाटत असते . सुझकी , टोयोटा, जनरल मोटर्स इत्यादी विदेशी कंपन्या आपल्या मोटारी देशात खपवून विदेशात पैसे घेऊन जात आहेत . आज अनेकांकडे एका पेक्षा जास्त मोटारी असलेल्या आढळून येतात . देशात विकास मालू या उधोगपतीकडे जवळपास ५०० पेक्षा जास्त मोटारी आहेत . एकूणच मोटारीचे हे लोण कुठपर्यंत जाईल याचा अंदाज आज बांधणे कठीण आहे . यावर काही बंधने घालणे जरुरीचे आहे . आज रस्त्यावर अनेक गाड्या पार्क केलेल्या आढळून येतात .त्यामुळे वाहतुकीस अडथळा होतो . अपघाताची शक्यता बळावते . प्रयेक कुटुंबाकडे एकच गाडी असावी . तसेच सावर्जनिक वाहतूक व्यवस्था सोयीची व किफायतशीर असावी . लोकांनी त्याचा वापर करावा . इलेक्ट्रिक गाडयांना मोठ्या प्रमाणात सवलती दिल्या पाहिजेत . यावर काही बंधने न घातल्यास नजीकच्या काळात रस्त्यावर चालता येणे मुश्कील होणार आहे . आज जगात सर्वात जास्त दुचाकी भारतात आहेत . चीन अमेरिका व जपान नंतर सर्वात जास्त गाड्या भारतात आहेत

**- शांताराम वाघ पुणे**

### महाराष्ट्र शासनाची लाडकी बहिण योजना जनतेत संभ्रमित

महाराष्ट्र शासनाच्या लाडकी बहिण योजनेबद्दल ही योजना विधानसभा निवडणूकीपुरतीच लागु होणार काय याबद्दल अनेक तर्क वितर्क काढले जात आहेत. त्यामुळे संभ्रमाची परिस्थिती निर्माण झाली आहे.१) राज्य सरकारकडे तिजोरीत खडखडाट असताना अर्जदार बहिणींना १५००/- प्रमाणे ३ महिण्याचे ४५००/- रूपये कसे काय अदा करणार आहेत ?२) तसेच ही योजना सत्तेवर आल्यावरही सुरू करण्यात येणार आहे असे सांगण्यात येत आहे. ३)अनेक अर्जदार बहिणींचे पैसे अनेक कारणास्तव रखडलेले आहेत याबाबत यांना आशेचा मार्ग मिळेल का ४) तसेच काही काही बहिणींकडे त्रोटक अशा पुराव्यात त्रुटी दिसत आहेत यावर बहिणींना काही आधार दिला जाईल का ? ५) तिजोरीत पैसा नाही. महाराष्ट्र सरकार कर्जबाजारी आहे असे असताना सरकारची आवक योजना काय आहे ? ६)का केंद्र सरकार मदत करणार आहे? ७)अनेक योजनाची पुर्तता करण्यात येणार की निव्वळ मदतीच्या घोषणा निवडणुकी पुरत्याच लादल्या गेल्या आहेत.? सारांश, या सरकारचे काय भवितव्य आहे ? याची चर्चा सद्या सगळीकडे आहे.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर. अंधेरी**

## कसारा येथे भूस्खलनाने घर कोसळले

**शहापूर :** माळीण व इरसलवाडी येथे भूस्खलन होऊन संपूर्ण गाव मातीच्या ढिगाऱ्याखाली दाबले गेले. याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता कसारा गावात निर्माण झाली आहे. दरम्यान भूस्खलन होऊन कसारा येथील विठ्ठलवाडी येथे एक घर कोसळल्याची घटना घडली. यात मोठे नुकसान झाले आहे. शहापूर तालुक्यातील कसारा गाव हे डोंगरावर वसलेले आहे. शासकीय भूखंडावर हे गाव डोंगर दऱ्याखोऱ्यात वसल्याने पावसाळ्यात दरवर्षी भूस्खलन होऊन घरे कोसळत असतात. त्यानुसार आज सकाळच्या सुमारास वाळू किर्वे यांचे घर कोसळले आहे. या घटनेत जीवीतहानी झाली नसली तरी घरातील अन्न, धान्य, वस्त्र व घरातील वस्तू ढिगारेखाली अडकले आहेत. यांची माहिती मिळताच महसूल विभागाचे तलाठी व मंडळ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करून अहवाल सादर करणार आहेत. कसारा गाव हा वन विभागाच्या जागेवर वसलेले आहे. यामुळे चारही बाजूंनी डोंगर असून दरवर्षी भूस्खलन होऊन कोणत्या ना कोणत्या भागातील घरे कोसळत असतात. दर वर्षी महसूल विभागाच्या वतीने भूस्खलन होणाऱ्या ठिकाणाहून बहुतेक कुटुंब सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात येतात.



# एकाच कुटुंबातील चौघांनी केली आत्महत्या

## मृतकाच्या खिशात सापडली सुसाईड नोट

**प्रतिनिधी**
■ **नागपूर**

एकाच कुटुंबातील चौघांनी राहत्या घरात सामूहिक आत्महत्या केल्याची घटना जिल्ह्यातील मोवाड येथे घडली आहे. विजय मधुकर पाचोरी (६८) माला विजय पचोरी (५५) गणेश विजय पचोरी (३८) आणि दीपक विजय पचोरी (३६) अशी आत्महत्या करणाऱ्या चौघांची नावं आहेत. पोलिसांना एका मृतकाच्या खिशात सुसाईड नोट मिळून आली असून त्यावर सर्वांच्या सह्या देखील आहेत.

या घटनेची माहिती समजल्यानंतर मोवाड पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी घराचं दार आतून बंद होतं. पोलिसांनी दार उघडून घरात प्रवेश केला तेव्हा घरातील



चौघांचे मृतदेह दिसून आले. पोलिसांनी सर्व मृतदेहाचा पंचनामा केला असता गणेश विजय पचोरीच्या खिश्यात एक सुसाईड नोट आढळून आली. त्यावर सर्वांनी आत्महत्या करण्यापूर्वी सह्या केलेल्या आहेत. पोलिसांनी चारही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी नागपूरला पाठवून पुढील तपास सुरू केलाय.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार गणेश पचोरी हा 'मातृ सेवा इंडिया निधी पतसंस्थे'चा संचालक आहे. फेब्रुवारीमध्ये त्याच्यावर फसवणूकीचा एक गुन्हा दाखल आहे. याप्रकरणी त्याला अटक देखील झाली होती. ऑगस्ट महिन्यात गणेश पचोरी जामिनावर बाहेर आला होता. मात्र या प्रकरणात या कुटुंबाची प्रचंड बदनामी झाली होती, या कारणाने आत्महत्या केली असल्याचं सुसाईड नोटमध्ये नमूद असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

सहा महिन्याच्या बाळासह केली आत्महत्या : अशीच एक घटना आज छत्रपती संभाजीनगरमध्येही घडली आहे. एका महिला डॉक्टरनं सहा महिन्याच्या बाळासह आत्महत्या केली आहे. पतीही डॉक्टर असताना तरुण महिला डॉक्टरनं अचानक असं पाऊल उचलल्यानं सगळीकडं हळहळ व्यक्त होत आहे.

# आग लागताच एकापाठोपाठ एक 15 सिलेंडरचा स्फोट

**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

ठाण्यात आगीची मोठी घटना घडली आहे. ठाण्यातील वागळे इस्टेट परिसरात एका कंपनीला ही आग लागली आहे. संबंधित कंपनीला आग लागताच एकापाठोपाठ एक अशा तब्बल 15 सिलेंडरचा धाड धाड स्फोट झाल्याचा आवाज परिसरात आला. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये देखील भीतीचं वातावरण आहे. आग नेमकी कशामुळे लागली? ते अद्याप समजू शकलेलं नाही. पण गेल्या तीन तासांपासून ही आग धुमसत आहे. या आगीत कितपत नुकसान झालं आहे ते अद्याप समजू शकलेलं नाही. आगीत कुणी जखमी झाले आहे का? याबाबतची माहिती देखील अद्याप समजू शकलेली नाही. पण आगीत संबंधित कंपनी जळून खाक होताना दिसत आहे. आगीमुळे धुरांचे मोठमोठे लोळ हवेत मिसळताना



दिसत आहेत. हे लोळ पाहिल्यानंतर आग किती भीषण आहे याचा प्रत्यय येतोय. मिळालेल्या माहितीनुसार, ठाणे शहरात वागळे इस्टेट परिसरात असणाऱ्या एका चिप्सच्या कंपनीला ही आग लागली आहे. व्यंकट रमण फूड कंपनी असं या कंपनीचं नाव आहे. या कंपनीत चिप्स आणि कुरकुरे निर्माण केले जातात. या कंपनीत वेफर आणि पुठ्ठयांना आग लागली आहे. ही आग प्रचंड भडकली आहे. आग लागल्यानंतर एकापाठोपाठ तब्बल 15 सिलेंडरच्या स्फोटाचे आवाज आला. त्यामुळे परिसरातील नागरीक भयभीत झाले.आगीच्या घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली. अग्निशामक दलाच्या जवानांकडून आग विझवण्याचे शर्थीने प्रयत्न सुरु आहेत. पण आग विझवण्यात अद्यापही यश आलेलं नाही. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आतापर्यंत 10 अग्निशमन बंब आणि 8 टँकर घटनास्थळी आणण्यात आले आहेत.

# शिल्पकार जयदीप आपटेचा जामीन अर्ज फेटाळला

**प्रतिनिधी**
■ **मालवण**

मालवण राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा दुर्घटनाप्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या शिल्पकार जयदीप आपटे याने आपल्याला जामीन मिळावा यासाठी येथील जिल्हा व सत्र न्यायालयात विनंती अर्ज दाखल केला होता. यावर मंगळवारी सुनावणी होऊन हा अर्ज प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एच. बी. गायकवाड यांनी नामंजूर केला आहे.

पुतळा उभारतेवेळी ज्या गोष्टींची काळजी घेणे आवश्यक होते त्या गोष्टींची काळजी घेतली गेली नाही. त्याचबरोबर पुतळा उभारणीमध्ये वापरण्यात आलेले सर्व साहित्य हे निकृष्ट दर्जाचे होते. याबाबतचा युक्तिवाद सरकारी वकील यांनी केला. हा युक्तिवाद ग्राह्य मानत न्यायालयाने जयदीप आपटेचा जामीन अर्ज नामंजूर केला आहे.

जयदीप आपटे याने हे टेंडर २ कोटी ४ लाख रुपयांना घेतलेले होते आणि संपूर्ण रक्कम त्याला मिळालेली आहे. परंतु पुतळा उभारताना जे साहित्य वापरले ते निकृष्ट दर्जाचे होते आणि बांधकाम वगैरे सर्व निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे हा पुतळा कोसळला असा समितीचा अहवाल आला आहे. यात आपटे याचा सहभाग असल्याचे सरकारी वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. न्यायालयाने या अगोदर चेतन पाटील याचा जामीन फेटाळलेला होता.

# आता बदल हवो तर आमदार नवो!

## केसरकरांच्या विरोधात बॅनरबाजी

**प्रतिनिधी**
■ **सावंतवाडी**

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री दिपक केसरकर यांच्या विरोधात एका अज्ञात व्यक्तीने "आता बदल हवो तर आमदार नवो", या मथळ्याखाली बॅनर झळकवले आहेत. या विरोधात शिवसेना (शिंदे गट) आक्रमक भूमिकेत असून पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी निवेदन सादर केले आहे. "आता बदल हवो तर आमदार नवो", या मथळ्याखाली सावंतवाडीचे स्थानिक आमदार तथा शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी गेल्या काही वर्षांत केलेल्या विकासात्मक घोषणांच्या विरोधात सावंतवाडी शहरासह मतदारसंघात काही ठिकाणी बॅनर लावण्यात आले आहेत. या बॅनरच्या विरोधात आक्रमक झालेल्या शिवसेना पदाधिकाऱ्यांनी सावंतवाडी पोलीस ठाण्यात धडक देत संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली. दीपक केसरकर शिवसेना पक्षाचे प्रमुख नेते असून त्यांची यापुढे



अशा रीतीने बदनामी कोणाकडून होत असेल तर शिवसेना पक्ष कायदा हातात घेतल्याशिवाय राहणार नाही असा इशाराही यावेळी पदाधिकाऱ्यांनी दिला.

याबाबतचे निवेदन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अशोक दळवी यांनी सावंतवाडी पोलीस निरीक्षक अमोल चव्हाण यांना सादर केले. यावेळी महिला आघाडी प्रमुख ॲड. नीता कवीटकर, उपजिल्हाप्रमुख विनायक दळवी, तालुकाप्रमुख बबन राणे, शहर प्रमुख बाबू कुडतरकर, माजी नगराध्यक्षा अनारोजीन लोबो, माजी उपनगराध्यक्ष राजन पोकळे, उपतालुकाप्रमुख गजानन नाटेकर आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# फडणवीसांचे राजकीय गणित मीच बिघडवणार - जरांगे

**प्रतिनिधी**
■ **संभाजीनगर**

मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा छगन भुजबळांवर हल्लाबोल केला आहे. विशेष म्हणजे जरांगेंनी लक्ष्मण हाकेंबद्दल जास्त बोलणं टाळलं आहे. लक्ष्मण हाके यांना मी विरोधक मानत नाही, त्यामुळे त्यांच्या वैयक्तिक आयुष्यावर मी बोलणार नाही. काहींचे संस्कार आडवे येण्याचे असतात, मात्र आपले ते संस्कार नाहीत, असं म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी हाके यांच्याबाबत जास्त काही बोलण्यास नकार दिला.

विरोधक मानत नाही, त्यावर बोलणार नाही: शेवटी छगन भुजबळ आणि देवेंद्र फडणवीस काय बोलतात ते बघा, बाकी लक्ष देण्यासारखे नाही. मी आधीच सांगितलंय की, शेवटी कर्ताकरविता छगन भुजबळ आहेत, त्यामुळे दुसऱ्याला दोष देऊन उपयोग नसल्याचंही मनोज जरांगेंनी सांगितलंय. कर्ताकरविता दोषी आहेत, असं मला वाटतं. खरं तर यावर माझं काहीही म्हणणे नाहीच, मी सरळ आहे. मी ज्याला विरोधक मानतो, त्याचा तुकडाच पाडतो. मात्र मी ज्याला विरोधक मानत नाही, त्याच्यावर मी बोलतच नाही. कोणी अडचणीत आला असेल तर त्याला अजून अडचणीत आणण्याचे आमच्यावर संस्कार नाहीत, असंही मनोज जरांगे म्हणालेत.

आरक्षणाचा मुद्दा मार्गी लावा, भाजपामधील मराठेदेखील त्यात आहेत, त्यांनीसुद्धा वरिष्ठांकडे आग्रह धरावा. मी राजकारणात जाणार नाही, मात्र नाईलाज झाला तर तसं होईल, दगाफटका करू नका, असंही जरांगे पाटील यांनी विरोधकांना ठणकावून सांगितलंय. फडणवीस साहेब तुम्ही चूक करू नका, मराठ्यांना गाफील ठेवून तुम्ही आचारसंहिता लागू करू नका. आरक्षण न देता तुम्ही फक्त तारखा जाहीर करूनच दाखवा, मग मराठ्यांचा वचका तुम्हाला कळेल. तुमचे राजकीय गणित मनोज जरांगे पाटील बिघडविणार म्हणजे बिघडवणारच, असा इशाराही मनोज जरांगे यांनी देवेंद्र फडणवीसांना दिला आहे. मराठा आणि कुणबी एकच आहेत, ओबीसींमध्ये बाकीच्या जाती-पोटजाती म्हणून एकत्र केल्या आहेत, त्या कशाच्या आधारावर याचे उत्तर द्या, तुम्हाला अशा किती जाती दाखवू. रोज व्यवसाय करणाऱ्या जातींमध्ये पोट जाती घातल्या आहेत.



















# लोकनेते हितेंद्र ठाकूर विकासाचे शिल्पकार



**वसई-विरारच्या** विकासाच्या वाटचालीतला महत्त्वाचा चेहरा म्हणजे लोकनेते आमदार हितेंद्र ठाकूर. गेली तीन दशके त्यांनी वसईतील राजकारणावर आपली छाप सोडली असून, लोकांच्या मनात आपले स्थान मजबूत केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील बहुजन विकास आघाडीने 2014 पासून अनेक राजकीय आव्हानांना यशस्वीरित्या तोंड दिले आहे. त्यांनी लोकांच्या मनावर जी पकड निर्माण केली आहे, त्यामुळे त्यांचा कोणताही उमेदवार सहज विजयी होतो, हे वसईतील राजकारणाचे वैशिष्ट्य बनले आहे.

हितेंद्र ठाकूर यांची राजकीय वाटचाल 1990 साली काँग्रेस व जनता दलासारख्या पक्षांना मागे टाकून सुरु झाली. त्यांनी वसई विकास मंडळाची स्थापना करून वसईच्या विकासाला नवीन दिशा दिली. हा प्रवास न थांबता, त्यांच्या नेतृत्वाखालील बहुजन विकास आघाडीने अनेक निवडणुका जिंकल्या आणि वसई-विरार उपप्रदेशात आपले वर्चस्व प्रस्थापित केले. त्यांनी केवळ निवडणुका जिंकून थांबले नाहीत, तर लोकांच्या समस्यांकडेही लक्ष देत त्या सोडवण्यासाठी कायम पुढे राहिले.

वसईतील वाढती लोकसंख्या आणि पाणीटंचाई हा एक मोठा प्रश्न होता, ज्यावर त्यांनी आपल्या मुत्सद्दीपणातून तोडगा काढला. सूर्या धरणातून वसई-विरारला अतिरिक्त पाणी मिळावे यासाठी त्यांनी एमएमआरडीएकडून विशेष योजना मंजूर करून घेतली. तसेच, भविष्याच्या गरजा लक्षात घेऊन त्यांनी अनेक धरण योजनांना गती दिली, ज्यामध्ये खोलसापाडा धरण हा महत्त्वाचा प्रकल्प आहे. हे धरण पूर्णत्वास आल्यावर वसई-विरारच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमचा सुटेल.

कोरोना काळातही त्यांनी आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे निभावल्या. नागरिकांसाठी मदतीचा हात पुढे करत, अनेक सामाजिक आणि धार्मिक संस्थांना सहकार्य केले. त्यांची ही सेवा भावना आणि कर्तव्यनिष्ठा त्यांना खऱ्या अर्थाने लोकनेता ठरवते.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत अपेक्षित यश न मिळाले तरी, त्यांची शांत संयमी वृत्ती विरोधकांना धडकी भरवणारी ठरली आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील बहुजन विकास आघाडीने 2015 च्या महापालिका निवडणुकीत 106 नगरसेवक निवडून आणत राजकीय वर्चस्व सिद्ध केले होते. कार्यकर्त्यांचा विश्वास आहे की, या विधानसभेतही त्यांचा करिष्मा पुन्हा एकदा दिसेल.

वसई-विरारच्या विकासाचे नेतृत्व करणाऱ्या हितेंद्र ठाकूर यांच्या दीर्घायुष्यासाठी आणि उज्ज्वल भवितव्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

**(श्री. सुधीर भोईर**
**पत्रकार, वसई-विरार)**















# लोक अदालतीतून 3 हजार 747 ग्राहकांच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा

प्रतिनिधी
■ कल्याण

तालुकास्तरावर २८ सप्टेंबर रोजी आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीतून कल्याण आणि भांडुप परिमंडलातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित तसेच वीजचोरीची दाखलपूर्व व प्रलंबित अशी ३ हजार ७४७ प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढण्यात आली. महावितरणच्या उपलब्ध सवलतीचा लाभ घेत संबंधित ग्राहकांनी ६ कोटी ३३ लाख रुपयांचा भरणा केला.

कल्याण आणि भांडुप परिमंडलातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित केलेल्या तसेच वीज चोरीची दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने सोडवण्यासाठी लोक अदालतीत ठेवण्यात आली होती. त्यानुसार ३ हजार ७४७ प्रकरणांमध्ये तडजोड होऊ शकली व ६ कोटी ३३ लाख रुपयांचा भरणा झाला. यात कल्याण परिमंडलातील कल्याण मंडल एक २५० प्रकरणांमध्ये तडजोड होऊन ७१ लाख रुपयांची वसुली झाली. कल्याण मंडल दोनमध्ये २ हजार ३६२ प्रकरणे ४ कोटी ११ लाख रुपयांच्या वसुलीने सामोपचाराने मिटवण्यात आली. वसई मंडलात ४२ प्रकरणांच्या निपटाऱ्यातून १९ लाख रुपयांची वसुली होऊ शकली. तर पालघर मंडल कार्यालयांतर्गत २७ लाख रुपयांचा भरणा करणाऱ्या २०९ ग्राहकांची प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली.

भांडुप परिमंडलातील ठाणे मंडलात ३७ लाख रुपयांचा भरणा करणाऱ्या ३६६ ग्राहकांची प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. वाशी मंडल कार्यालयांतर्गत ४८२ प्रकरणांमध्ये तडजोड होऊन ६७ लाख रुपयांची वसुली झाली. तर पेण मंडलात अडीच लाखांचा भरणा करणाऱ्या ३६ ग्राहकांची प्रकरणे सामोपचाराने मिटवण्यात आली.

ठाणे, रायगड आणि पालघर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सहकार्याने तसेच भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे व कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अभियंते, महावितरणच्या विधी विभागाने लोक अदालत यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.












## माझी माऊली चषक मोफत शालेय कॅरम स्पर्धा आजपासून, अव्वल 64 खेळाडूंचा सहभाग

**मुंबई :** सार्वजनिक नवरात्र महोत्सव मंडळ-जेजे व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे आंतरशालेय १६ वर्षांखालील मुलांची विनाशुल्क कॅरम स्पर्धा ३ ते ७ ऑक्टोबर दरम्यान दैवत रंगमंच, जे. जे. हॉस्पिटल कंपाऊंड, भायखळा-पूर्व येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत अव्वल ६४ खेळाडूंचा सहभाग असून सिद्धांत मोरे, उमैर पठाण, ध्रुव भालेराव, वेदांत राणे, प्रसन्न गोळे, पुष्कर गोळे, श्रीशान पालवणकर, जितेंद्र जाधव, गौरव मांजरेकर, प्रसाद माने, नैतिक लादे, अथर्व आरकर, समीर खान, अनय म्हेत्रे, आदेश महाडिक आदीच्या कामगिरीकडे विशेष लक्ष राहणार आहे. अ गटात सर्वेश परुळेकर विरुद्ध समर्थ मयेकर यांच्या उद्घाटनीय लढतीने दुपारी ३ वाजता स्पर्धेला सुरुवात होईल. ब गटात वेदांत हळदणकर विरुद्ध मयांक पाल, क गटात प्रसन्न गोळे विरुद्ध हर्ष गावकर तसेच ड गटात पुष्कर गोळे विरुद्ध राहुल पाटील अशा सलामीच्या लढती रंगतील. दर्जेदार स्पर्धेचे पूर्णपणे मोफत आयोजन करण्यासाठी नवरात्र महोत्सव मंडळाचे अध्यक्ष कृष्णा रेणोसे, सरचिटणीस भूषण परुळेकर, कार्यवाह चंद्रकांत करंगुटकर आदी विशेष कार्यरत आहेत.




# आरे तलाव सुशोभीकरण व गाळ काढण्यासाठी सुमारे 15 कोटी मंजुर

## खा. रवींद्र वायकर यांनी केला होता पाठपुरावा

प्रतिनिधी

■ मुंबई

निसर्गरम्य अशा वातावरणात तसेच मुंबईचे फुफ्फुस अशी ओळख असलेल्या आरे तलावाचे सुशोभीकरण व गाळ काढण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांच्या पाठपुराव्यामुळे तसेच विधानसभेत आरेतील विविध प्रश्ना संदर्भात प्रश्न मांडल्यामुळे आरे तलावाच्या सुशोभीकरणासाठी तसेच गाळ काढण्यासाठी निधी देण्याची केलेली मागणी अखेर मान्य करण्यात आली आहे. असे खा.वायकर यांच्या वतीने सांगण्यात आले.

जिल्हाधिकारी यांनी आरे तलाव सुशोभीकरण व गाळ काढण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिली आहे. या कामासाठी रुपये १४ कोटी ९१ लाख ६४ हजार 825 इतका निधी मंजुर केला आहे.आरेतील निसर्ग रम्य वातावरणाचा आनंद घेण्यासाठी दरदिवशी हजारो नागरिक तसेच देश विदेशातील पर्यटक येतात. आरेतील २७ आदिवासी पाडे व अन्य रहिवाशांना चांगल्या सुविधा देण्याबरोबरच येथील पर्यटकांमध्ये वाढ व्हावी यासाठी या ठिकाणी अधिक दर्जेदार सोई-सुविधा देण्यासाठी खासदार वायकर सातत्याने प्रयत्न करीत आहेत. यात आरे पिक निक उद्यान, छोटा काश्मीर, आरे तलाव, आरे रुग्णालय, आरेतील अंतर्गत रस्ते आदी कामांचा समावेश आहे. या कामांसाठी निधी प्राप्त व्हावा तसेच शासनाने मंजुरी द्यावी यासाठी खासदार वायकर यांनी आमदार असताना विधानसभेत लक्षवेधी, तारांकित प्रश्न, औचित्याचा मुद्दा आदी विविध आयुधांच्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष वेधले होते. यावेळी आरेतील अंतर्गत रस्ते मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून करण्यात येतील तसेच आरे तलावातील गाळही मुंबई महानगर पालिका काढेल, असे आश्वासन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सभागृहात दिले होते. मुंबई महानगरपालिकेने आरे तलावातील गाळ काढण्यासाठी आरे प्रशासनाने रुपये १० कोटी मनपाकडे भरावे, असे पत्र मनपाने आरे प्रशासनास पाठवले होते.

आरे तलावातील गाळ व सुशोभीकरणासाठी सुमारे १५ कोटी रुपयांच्या कामास जिल्हाधिकारी यांनी प्रशासकिय मंजुरी दिली आहे. या कामासाठी लवकरच निविदा काढण्यात येणार असून कंत्राटदाराची नियुक्ती झाल्या नंतर या कामास सुरुवात करण्यात येणार आहे. असे खासदार रविंद्र वायकर यांनी सांगितले.

# 'स्वच्छताही सेवा' मोहीम: अतिरिक्त महासंचालक विदेश व्यापार कार्यालय, मुंबई यांचा पुढाकार

प्रतिनिधी

■ मुंबई

राष्ट्रीय "स्वच्छता ही सेवा" मोहिमे अंतर्गत (17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर) अतिरिक्त महासंचालक विदेश व्यापार कार्यालय, मुंबई यांच्या कार्यालयाच्या पथकाने विशेष जनजागृतीचा प्रयत्न म्हणून चर्चगेट येथील प्रसिद्ध खाऊ गल्लीची स्वच्छता केली आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ केली व स्वछता राखण्याच्या महत्त्वाबाबत जनजागृती करण्याचे काम केले. श्री राजेश कुमार मिश्रा, विदेश व्यापार विभागाचे अतिरिक्त महासंचालक यांनी खाऊ गलीतील दुकानदारांना संबोधित करताना स्वच्छतेचे महत्त्व सांगितले.



17 सप्टेंबरपासून सुरू झालेल्या या मोहिमे अंतर्गत, विदेश व्यापार कार्यालयाच्या अतिरिक्त महासंचालक, मुंबई यांनी जागरूकता वाढवणे आणि स्वच्छ आणि निरोगी भारतासाठी योगदान देण्याच्या उद्देश्याने अनेक उपक्रमांचे आयोजन केले. यामध्ये स्वच्छता प्रतिज्ञा, हिरवाई वाढवण्यासाठी वृक्षारोपण मोहीम, सहभागींना कल्पकतेने गुंतवून ठेवण्यासाठी पोस्टर मेकिंग स्पर्धा आणि कार्यालय परिसर आणि रेकॉर्ड रूमची स्वच्छता यांचा समावेश होता. याशिवाय "स्वच्छता संवाद" चे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये वैयक्तिक आणि सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेचे महत्व सांगण्यात आले.

स्वच्छता आणि सामुदायिक सेवेच्या भावनेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या मोहिमेचा उद्देश होता, ज्यामध्ये अतिरिक्त

# रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली वाडीबंदर, मुंबईची पाहणी

■ मुंबई

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल वाडीबंदर कोचिंग डेपो, मुंबई येथे सर्वसमावेशक तपासणी केली. त्यांनी डेपोच्या पायाभूत सुविधा, तांत्रिक प्रगती आणि भविष्यातील विस्तार योजनांचा आढावा घेतला. तपासणीत प्रवाशांची सुरक्षा, स्वच्छता आणि सेवेची विश्वासार्हता वाढवण्यावर भर देण्यात आला.

ट्रेन सेफ्टी आणि मेंटेनन्सवर भर मंत्र्यांनी एलएचबी (लिंक हॉफमन बुश) कोचमध्ये केलेल्या सुधारणांची पाहणी केली, ज्यामध्ये स्प्रिंग फेल्युअर्स कमी करण्यासाठी, राइड आराम आणि सुरक्षितता वाढवण्यासाठी टीपीयू (TPU) रिंग जोडणे समाविष्ट आहे. तसेच त्यांनी स्वच्छतापूर्ण वातावरण राखण्यासाठी डेपोच्या "बेस्ट फ्रॉम वेस्ट" प्रदर्शनात इन-हाऊस डिझाईन केलेल्या कचरा संकलनासारख्या नवकल्पनांद्वारे केलेल्या प्रयत्नांची प्रशंसा केली. स्वच्छतागृहांसह कर्मचाऱ्यांच्या सुविधांच्या स्वच्छतेचीही त्यांनी पाहणी केली.



वंदे भारत एक्स्प्रेसच्या "14-मिनिटांच्या आश्चर्यकारक" साफसफाईच्या प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या डायसन व्हॅक्यूम क्लिनरसह प्रगत स्वच्छता उपकरणांचा वापर मंत्र्यांनी वैयक्तिकरित्या प्रात्यक्षिकही केले. गाड्यांच्या तपासणीमध्ये एअर ब्रेक अखंडता सुनिश्चित करण्यासाठी अल्ट्रासोनिक एअर लीकेज डिटेक्शन सिस्टम आणि वेळेवर देखभाल करण्यासाठी FIBA (फेल्युअर इंडिकेशन आणि ब्रेक ॲप्लिकेशन) सिस्टम सारखी प्रगत साधने वैशिष्ट्यीकृत केली गेली.



*मुंबई : कर्नाटक राज्यातील हम्पी शहरात UTSAV DE HAMPI या off-road national level मोटार रेस स्पर्धेत महाराष्ट्रात मुंबई मालाड मधून ड्राइवर सुभाष उतेकर आणि साताऱ्यातील को-ड्राइवर पराग पाटीलयांच्या टीम दानवने मिळून सर्वोत्तम प्रथम खिताब पटकावला.त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.*

## मुंबईतील तरूणीची अलिबागेत आत्महत्या

**मुंबई ।** पर्यटक म्हणून अलिबागला गेलेल्या मुंबईतील गोरेगाव येथील तरूणीने अलिबागमधील एका कॉटेजमध्ये आत्महत्या केली. नेहा अविनाश पोतदार असे या ३४ वर्षीय तरूणीचे नाव असून विष प्राशन करून तिने आपले जीवन संपवले. नेहा ३० सप्टेंबर रोजी ती थेट अलिबागला आली. अलिबागच्या कुरूळ येथील एका कॉटेजमध्ये ऑनलाइन बुकींग करून राहिली होती. बुधवारी सकाळी ती रूमबाहेर आली नाही म्हणून कर्मचारयाने दरवाजा वाजवला. तरीही प्रतिसाद न मिळाल्याने पोलीसांना पाचारण करण्यात आले. पोलीसांनी दरवाजा उघडला असता ती रूममध्ये मृतावस्थेत पडलेली आढळून आली.


## पुणे महानगरपालिका, पुणे

जाहिरात क्रमांक :-२/८०९
दि. ०१/१०/२०२४

निविदा प्रकिया कक्ष पथ विभाग
निविदा जाहिरात नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : ०३-०९-२०२४ ०९:०० सकाळी ते १०-०९-२०२४ ०२:३० दुपारी पर्यंत
स्वीकृती दिनांक : ०३-०९-२०२४ ०९:०० सकाळी ते १०-०९-२०२४ ०२:३० दुपारी पर्यंत तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक ११-०९-२०२४ ०३:०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किमंत रु. | अंदाजित पूर्व गणित रक्कम | बयाणा रक्कम रु | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC / ROAD/2024/381 | पथ | प्रभाग क्र ३ वडगावशेरी स. नं ३० मधून जाणारा पूर्व पश्चिम १२ मी व ७.५ मी अंतर्गत रस्ता विकसित करणे | रु ११७७९/- | रु २७५२१६९७/- | रु १५००००/- | १२ | किरण फलशेट्टी ९६८९९३१४२७ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी / शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून मंदर कामाचे निविदा www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यसाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृत सदर वेबसाईटवरून फत ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पचतीने मागविण्यात येत आहेत. ब) निविदा प्रकियाच्या शेवटच्या दिवशी मंच प्राम न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील. क) ऑनलाईन निविदा प्रक्रिया बाबतची संपूर्ण माहिती टेंडर मेल विभाग पुणे म.न. पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि) / ३२ दिनाक २२/०४/२०१६ नुसार बयाना रक्कम इ.सी एम./आर.टी.जी.एम./एन. एफ. टी सुविधेमार्फतच स्वीकारनेत येणार आहे.

जावक क्र. : मावजसंका / ९९८
दिनांक : ०१/१०/२०२४

(स्वाक्षरी-/)
कार्यकारी अभियंता, पथ
पुणे नगरपालिका

(स्वाक्षरी-/)
अधिक्षक अभियंता (पथ)
पुणे महानगरपालिका






* नामकरण *

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुंबई

संत गाडगेबाबा स्वच्छ भारत प्रबोधिनी
गोरेगाव, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती व नागपूर येथे सुरु करणार



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
कौशल्यम् बलम्



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री




एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/डी ३८०३

प्रशिक्षणातून प्रगतीकडे

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना

https://rojgar.mahaswayam.gov.in किंवा https://cmykpy.mahaswayam.gov.in
या संकेतस्थळावर उमेदवारांनी / आस्थापनांनी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक



लोकार्पण

जयंत चौधरी
केंद्रीय राज्यमंत्री, (स्वतंत्र कार्यभार),
कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार

विशेष उपस्थिती

एकनाथ शिंदे — मुख्यमंत्री
देवेंद्र फडणवीस — उपमुख्यमंत्री
अजित पवार — उपमुख्यमंत्री

संकल्पना

मंगल प्रभात लोढा
मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता

गुरुवार, दि. ०३ ऑक्टोबर २०२४ रोजी स १०.४५ वा.
स्थळ : एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, मेट्रो सिनेमा समोर, मुंबई.

निमंत्रक

गणेश पाटील — सचिव, कौ.रो.उद्यो. व नावि
डॉ अपूर्वा पालकर — कुलगुरू, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ
प्रदिप डांगे — आयुक्त, कौ.रो. उद्यो. व नावि
सतिश सुर्यवंशी — संचालक, व्य.शि. व प्रशि.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन

# 2000 कोटींचे ड्रग्ज जप्त, दिल्लीत चौघांना अटक

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**



दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने केलेल्या कारवाईत तब्बल २००० कोटी रुपये किंमतीचे कोकेन जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणात पोलिसांनी चार जणांना अटक केली आहे.

दिल्लीपोलिसांनी कारवाई करत ड्रग्जचा मोठा साठा जप्त केला आहे. विशेष पोलीस पथकाने तब्बल दोन हजार कोटी रुपये किंमतीचे कोकेन जप्त केले आहे. दक्षिण दिल्लीतील कारवाईनंतर हे कोकेन जप्त करण्यात आले आहे.

दिल्ली पोलिसांनी याबद्दल माहिती दिली. पोलिसांच्या विशेष पथकाने तब्बल ५६५ किलोपेक्षा जास्त कोकेन जप्त केले. या प्रकरणात ४ लोकांना अटक केले आहे. ड्रग्जची किंमत बाजारभावानुसार २ हजार कोटी रुपये सांगण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या लोकांची चौकशी पोलिसांकडून केली जात आहे. ५६५ किलो कोकेन दिल्लीत कशासाठी आले होते? हे ड्रग्ज कोणाला पुरवले जाणार होते? या नेटवर्कमध्ये आणखी कोण-कोण आहे? या प्रश्नांची उत्तर शोधण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

या ड्रग्ज नेटवर्क मागे आंतरराष्ट्रीय रॅकेट असल्याचा संशय पोलिसांना आहे. दिल्लीत इतक्या मोठ्या प्रमाणात कोकेन जप्त करण्याची ही पहिलीच वेळ आहे. कोकेन हे पार्ट्यांसाठी पुरवले जाते, त्यामुळे पोलिसांसमोर याचा शोध घेण्याचे मोठे आव्हान आहे.






## बदलापूर लैंगिक प्रकरणातील शाळा संस्थापक व संचालक पोलिसांच्या ताब्यात

**ठाणे :** बदलापूर येथील लैंगिक अत्याचार प्रकरणातील शाळेचे संस्थापक व संचालक यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तुषार आपटे आणि उदय कोतवाल असे अटक झालेल्या आरोपींची नावे आहेत. मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयाने या दोघांच्या अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला होता.

ठाणे क्राइम ब्रँचकडून या दोन्ही आरोपींना अटक केली आहे. तसेच या दोघांना एसआयटीच्या ताब्यात देण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे. गेल्या दीड महिन्यांपासून हे दोन्ही आरोपी फरार होते. आरोपी अक्षय शिंदेच्या एन्काउंटरनंतर शाळेच्या संस्थापक आणि संचालकांना देखील अटक करण्याची मागणी विरोधकांनी लाऊन धरली होती.

लैंगिक आत्याचाराची घटना ज्या शाळेत झाली होती त्या शाळेचे संचालक व सचिव यांचा अटकपूर्व जामीन मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळला आहे. अटकपूर्व जामीन मिळावा म्हणून संचालक आणि सचिवांनी याचिका दाखल केली होती. मात्र ही याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. दोघांना अटकेपासून दिलासा देण्याचे हे प्रकरण नाही, अशी टिप्पणी न्यायालयाने केली आहे.























